www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  +91 97023 86118

दैनिक
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ११९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### देशाच्या विकासासाठी वन नेशन वन इलेक्शनची गरज - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

● मुंबई, सुचित शिंदे :

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय मंत्रीमंडळाने एक देश एक निवडणुक (वन नेशन वन इलेक्शन) या प्रस्तावाला मंजुरी दिली. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने सादर केलेल्या एक देश एक निवडणुक (वन नेशन वन इलेक्शन) या अहवालाला केंद्रीय मंत्रीमंडळाने स्वीकृत करुन मंजुरी दिली. केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुर केलेल्या वन नेशन वन इलेक्शन प्रस्तावाचे रिपब्लिकन पक्षाचे वतीने आपण स्वागत करीत आहोत. देशाच्या विकासासाठी वन नेशन वन इलेक्शन अर्थात एक देश एक निवडणुक ची गरज असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले आहे.

विधानसभा आणि लोकसभा निवडणुका दर ५ वर्षांनी एकत्र झाल्या तर निवडणुकांवर होणारा अमाप खर्च वाचला जाईल.त्या वधलेल्या निधीतून देशाचा विकास अधिक वेगाने होण्यास मदत होईल. त्यासाठी एक देश एक निवडणुक (वन नेशन वन इलेक्शन) ची सुरुवात आपल्या देशात झाली तर ती देशाच्या विकासासाठी चांगली राहील. देशाच्या विकासासाठी निवडणुकीमध्ये होणारा अमाप खर्च वाचला तर तो खर्च देशाच्या विकासासाठी कारणी लावता येईल. त्यामध्ये देशाचे हित आणि फायदा आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्यावतीने वन नेशन वन इलेक्शन प्रस्तावाचे आम्ही स्वागत करीत आहोत. अशी प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली आहे.

### भारतात प्रथमच गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे जागतिक फिटनेस फेस्टीवलचे आयोजन

● ठाणे, सम्यक कासारे :

गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे येत्या शनिवार आणि रविवारी जागतिक फिटनेस फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिव्हलमध्ये जगभरातील सुमारे सात हजार स्पर्धक सहभागी होणार आहेत, अशी माहिती आयोजक एक्टवफिट एक्स्पोचे सीईओ संजय सोलंकी आणि शिवट्रान्स लॉजिस्टीकचे संचालक शुभम द्विवेदी यांनी दिली.

शरीर सोष्ठव क्षेत्रातील जगभरातील दिग्गजांच्या नावाने "ऑरनॉल्ड क्लासिक" या नावे हा फिटनेस फेस्टीवल आयोजित करण्यात येत असतो. भारतात प्रथमच हा फेस्टिव्हल आयोजित करण्यात आला आहे. या फेस्टिव्हलमध्ये मिक्स मार्शल आर्ट, बॉडी बिल्डींग, पॉवर लिफ्टिंग, वेट लिफ्टिंग, किक बॉक्सींग, स्ट्राँग मॅन इव्हेंट अशा पद्धतीच्या शारिरीक कौशल्याच्या स्पर्धा पार पडणार आहेत.

जगभरातून साधारणपणे दहा हजार लोक या फेस्टिव्हलमध्ये सहभागी होणार असून सात हजार लोक प्रत्यक्ष स्पर्धेत सहभाग नोंदविणार आहेत. या स्पर्धेत जिंकणाऱ्या भारतीय स्पर्धकांना पुढील वर्षी म्हणजेच 2025 मध्ये स्पेनमध्ये होणाऱ्या जागतिक स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविता येणार आहे, अशी माहिती शुभम द्विवेदी यांनी दिली.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर..

## पीएम विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्ती कार्यक्रमात होणार सहभागी

● मुंबई, यश सावंत :

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २० सप्टेंबरला महाराष्ट्रातील वर्ध्याला भेट देणार आहेत. सकाळी साडेअकराच्या सुमारास नरेंद्र मोदी येथे आयोजित पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाची प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. या कार्यक्रमादरम्यान पीएम विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना नरेंद्र मोदी हे प्रमाणपत्र आणि कर्ज वितरित करतील. तसेच, कारागिरांनी जपलेला वारसा आणि समाजाला दिलेल्या निरंतर योगदानाबद्दल नरेंद्र मोदींच्या हस्ते पीएम विश्वकर्मा योजनेच्या यशोगाथेला समर्पित एका स्मृती टपाल तिकिटाचे अनावरण देखील होणार आहे.

याचबरोबर, या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रातील अमरावती येथे प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्स्टाईल रिजन अँड अपारेल (पीएम मित्र) पार्कची पायाभरणीही होणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळातर्फे राज्य अंमलबजावणी संस्था म्हणून हे पार्क १००० एकरात उभारण्यात येत आहे. सरकारने वस्त्रोद्योग उद्योगासाठी सात पीएम मित्र पार्क उभारण्याला मंजुरी दिली आहे. भारताला वस्त्रोद्योग आणि निर्यातीचे जागतिक केंद्र बनवण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनाला प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

या पार्कमुळे थेट परदेशी गुंतवणुकीसह इतर प्रकारची गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर आकर्षित होईल आणि या क्षेत्रातील नवोन्मेष आणि रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळेल.

पान २ वर

# महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील १८४ वीज चोरांविरुद्ध गुन्हे दाखल

● कल्याण, रोहित जैसवार :



महावितरणच्या टिटवाळा उपविभागात वीज चोरांविरुद्ध धडक मोहीम नियमितपणे सुरू आहे. उपविभागातील सर्वाधिक गळती असलेल्या वीज वाहिनीवर गेल्या दीड महिन्यात केलेल्या तपासणीत १८४ जणांकडे ४४ लाख रुपयांची वीजचोरी आढळली. या सर्व १८४ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार मुरबाड पोलिस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली १ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या दीड महिन्याच्या कालावधीत ही कारवाई करण्यात आली. मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत टिटवाळा मंदिर, बल्याणी, बनेली, मांडा पश्चिम भागात १३४ तर गोवेली शाखेंतर्गत म्हारळ व वरप भागात ५० जणांकडे वीज चोऱ्या आढळून आल्या. पान २ वर

# रायगड किल्ल्यावरील रोपवेमध्ये अडकलेल्या नागरिकांची सुखरूप सुटका

● रायगड, विशाल पाटील :



छत्रपती शिवरायांच्या राजधानीचे ठिकाण असणाऱ्या किल्ले रायगड परिसरातील रोपवे मध्ये अडकलेल्या नागरिकांना सुखरूप खाली उतरविण्यात आले. रोपवे प्रशासनाने नव्याने आपल्या यंत्रणेमध्ये दाखल केलेल्या अत्याधुनिक सुरक्षात्मक यंत्रणेच्या माध्यमातून व एनडीआरएफच्या पथकाने गुरुवारी (दि. १९) केलेल्या थरारक कामगिरीने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद विभागांतर्गत रायगड रोपवे रेस्क्यू ऑपरेशनअंतर्गत मॉक एक्सरसाइजचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शासनाच्या भारतीय वायुदल, भारतीय वायुदल विशेष आर्मी, इंडियन कोस्टकार्ड मुरुड, एसडीआरएफ धुळे व नागपूर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, जिल्हा पोलीस अधीक्षक, नागरी संरक्षण दल उरण, उपविभागीय अधिकारी महाड, तहसीलदार महाड, रायगड रोप वे प्रशासन, आरोग्य विभाग, अग्निशमन दल महाड, साळुंखे रेस्क्यू टीम महाड, सिस्केप रेस्क्यू टीम महाड, आपदा मित्र महाड यांचे अधिकारी व सदस्य सहभागी झाले होते. पान २ वर

# आत्महत्येच्या प्रयत्नात असलेल्या ३ महिलांना तत्परतेने मदत करून वाचविण्यात नायगाव पोलिसांना यश



● पालघर, सुचिता सोनावणे:

वेगवेगळ्या घटनेत आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या तीन महिलांना नायगाव पोलिसांनी तत्परतेने मदत करून वाचविण्यात यश मिळवले. ११२ या नियंत्रण कक्षाला आलेल्या दूरध्वनीवरून माहिती मिळाताच पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी दोघींचे प्राण वाचवले. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळाराम पालकर यांनी गळफास घेतलेल्या महिलेला वैद्यकीय उपचार देऊन तिचे प्राण वाचवले. बुधवार १८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ च्या सुमरास नायगावच्या परेरानगर येथील रेड रोज इमारतीमध्ये राहणारी १६ वर्षीय तरुणी घरातील पंख्याच्या सिलिंगला दुपट्टा बांधून वॉशिंग मशीनवर चढून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत होती.

पान २ वर

# मुंबई-दिल्ली महामार्ग उंदरामुळे खचला, अजब दावा करणाऱ्या कर्मचाऱ्याची झाली हकालपट्टी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



मुंबई-दिल्ली महामार्ग खचला असून अनेक वाहनांचा अपघात झाला आहे. केसीसी बिल्डकॉन या कंपनीचा कनिष्ठ कर्मचारी असलेल्या एका कर्मचाऱ्याने सांगितले होते की, उंदरांमुळे महामार्ग खचला. या विधानामुळे वाद निर्माण झाल्यानंतर आता कंपनीने सदर कर्मचाऱ्याची हकालपट्टी केली आहे.

हकालपट्टी केलेल्या कर्मचाऱ्याला महामार्गाच्या बांधणीचे कोणतेही तांत्रिक ज्ञान नव्हते. त्याने केलेली टिप्पणी अतिशय चुकीची होती, त्यामुळे त्याला काढून टाकण्यात आले असल्याचे कंपनीने आपल्या निवेदनात सांगितले. तसेच हा कर्मचारी मेन्टेनन्स व्यवस्थापक नव्हता, असेही कंपनीने स्पष्ट केले आहे. "उंदीर किंवा छोट्या प्राण्याने हा खड्डा केला असावा. ज्यामुळे पाणी झिरपून मोठा खड्डा पडला असावा", अशी टिप्पणी या कर्मचाऱ्याने केली होती.

पान २ वर

# नाशिक सिव्हिल हॉस्पिटलमधील घटना ;



## महिलेच्या मृतदेहाच्या अंगावरील सोने गेल चोरीला

● नाशिक, सचिन कदम :

मृताच्या टाळूवरील लोणी खाणे म्हणजे काय याचा प्रत्यय बुधवारी नाशिक सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आला. हॉस्पिटलमधील एका महिलेच्या मृतदेहावरील सोन्याची पोत तोडून त्यामधील काही मणी आणि वाट्या चोरीस गेल्याने संवेदनाही मृत झाल्याचे दर्शन घडले. हातसफाई करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्याच्या कारनाम्याची हॉस्पिटलमध्ये दिवसभर चर्चा होती.

गौळाणे परिसरातील एकाच कुटुंबातील तिघांचे मृतदेह बुधवारी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. यामध्ये एका दाम्पत्यासह त्यांच्या लहान मुलीचाही समावेश होता. मुलीला विष देऊन त्यानंतर दाम्पत्याने गळफास घेतल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. हे मृतदेह सर्वप्रथम कुंभमेळा बिल्डिंगच्या कॅज्युल्टीमध्ये ठेवण्यात आले. ते शवविच्छेदनासाठी पाठविण्यापूर्वी त्यांच्या अंगावरील दागिने संबंधित नातेवाइकांकडे सुपूर्द करा, अशी सूचना तेथील कंत्राटी सुपरवायझर महिलेने उपस्थित कर्मचाऱ्याला केली. कर्मचाऱ्याने मृत महिलेची मान वर उचलली तेव्हा गळ्यातील पोत तुटलेली दिसली. त्याने ही बाब सुपरवायझर महिलेसह मृत महिलेच्या नातलगांच्या निदर्शनास आणून दिली. परंतु, आम्ही मृतदेह आणला तेव्हा पोत तुटलेली नव्हती, असा दावा नातलगाने केला. मृतदेह कोणी आत घेतला होता, याबाबत चौकशी झाल्यानंतर सुधीर राठोड या सफाई कर्मचाऱ्याचे नाव पुढे आले. पान २ वर

# ...आता ज्येष्ठ नागरिकांसाठी लोकलमध्ये असणार स्वतंत्र डब्बा; रेल्वे घेणार निर्णय


● मुंबई, नितीन देवळेकर :



वाढत्या गर्दीमुळे रेल्वेतून प्रवास करणं ज्येष्ठ नागरिकांसाठी अनेकदा त्रासदायक ठरतं. मात्र यावर आता उपाय शोधण्यात आला असून रेल्वे प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. लोकलमध्ये केवळ ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डब्बा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यासंबंधी कार्यादेश काढण्यात आला आहे.

के.पी.पी नायर या वकिलांनी अपंग प्रवाशांसाठी ज्याप्रमाणे वेगळा डब्बा आहे, त्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठीही स्वतंत्र डब्बा असावा अशी मागणी जनहित याचिकेद्वारे केली आहे. यानंतर रेल्वे मंडळाने यासाठी लागणारा खर्च आणि इतर व्यवहार्यता याचा अभ्यास केल्यानंतर २७ फेब्रुवारी रोजी या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. पान २ वर

# मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडीमधील एक बोगदा २० सप्टेंबरपासून वाहतुकीसाठी राहणार बंद !



● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्याय असलेल्या दोन बोगद्यांपैकी एका बोगद्याअंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी २० सप्टेंबरपासून वाहतूक बंद करण्यात येणार आहे. हा बोगदा गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ५ सप्टेंबरपासून वाहतुकीस मोकळा केला होता. यंदा 25 फेब्रुवारीपासून शिमगोत्सवापूर्वी कशेडी बोगद्यातून लहान वाहनांना या बोगद्याचा वापर कोकणात येण्यासाठी करण्याची परवानगी देण्यात आली. एक वर्षानंतर अपूर्ण असलेला दुसरा बोगदाही गणेशोत्सवाच्या तोंडावर मुंबईहून कोकणात जाणाऱ्या वाहनांसाठी सुरू करण्यात आला.

पान २ वर

# वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा जागतिक कृषी पुरस्काराने गौरव



● मुंबई, विशाल कारंडे :

पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्र यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या कामाची दखल घेऊन वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमकडून त्यांना जागतिक कृषी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. फोरमचा हा दुसराच पुरस्कार आहे. हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुख्यमंत्री शिंदे यांना प्रदान करण्यात आला. जागतिक बांबू दिनाच्या औचित्याने या समारंभाचे आयोजन करण्यात आले. एनसीपीएच्या सभागृहात झालेल्या या समारंभास महाराष्ट्र कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, 'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम' चे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंगे, फोरमचे आशिया प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. विलियम्स दार, आफ्रिका प्रांताचे उपाध्यक्ष प्रो. लिंदवे सिंबादा, अमेरिका प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. केनिथ क्वीन, फोरमचे भारतातील संचालक तथा इंडियन चेंबर ऑफ फूड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष डॉ एमजे खान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते. पान २ वर

## संपादकीय


# दिवास्वप्नांना स्वागतार्ह तडे !

सत्ताधाऱ्यांनी विकासाची स्वप्ने पाहणे- दाखविणे गरजेचेच असते, पण या स्वप्नांना वास्तवाचा, प्रबळ इच्छाशक्तीचा आणि प्रामाणिक प्रयत्नांचा आधार नसेल, तर त्या स्वप्नांतून समाज जेवढा लवकर जागा होईल, तेवढे उत्तम शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर उसळलेला जनक्षोभ फक्त पुतळ्यापुरता मर्यादित राहात नाही. पायाभूत सुविधांच्या निर्मितीची क्षमता, भ्रष्टाचार हे मुद्देखील या आंदोलनामुळे राजकीय पटलावर येतात. याचे कारण आहे पुतळ्याच्या पडण्याला लाभलेली पार्श्वभूमी ही पार्श्वभूमी राष्ट्रीय महामार्गावर पसरलेल्या खड्ड्यांच्या जाळ्याची, पडणाऱ्या पुलांची, विमानतळाची होती. ही पार्श्वभूमी नसती तरीही महाराष्ट्रात पुतळा प्रश्नावर एवढा जनक्षोभ उसळला असताच. पण साऱ्या देशभर हा मुद्दा चर्चिला जाण्याला पायाभूत सुविधांच्या निर्मितीबद्दल उपस्थित होणारे गंभीर प्रश्न हे एक महत्त्वाचे कारण निश्चितच आहे.

२०१४ सालच्या निवडणुकांच्या निकालानंतर देशात विकासासंदर्भात मोठी आशा निर्माण झाली होती, उत्साह होता. अगदी अल्पावधीत भारत विकासाच्या रस्त्यावर भरधाव प्रवास करू लागणार आणि प्रगत देशांच्या पंक्तीत जाऊन बसणार अशी आशा होती. त्याआधीच्या दहा वर्षांत देशाचा सरासरी आर्थिक वृद्धिदर हा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात जास्त होता. शेवटच्या दोन वर्षांत तो घसरला तरीही दहा वर्षांतील सर्वोच्च सरासरी वृद्धी दराने लोकांच्या आकांक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. आणि या आकांक्षांचे प्रतिनिधित्व देशातील तथाकथित मध्यम वर्गाने केले. 'तथाकथित' अशासाठी की स्वत:ला मध्यमवर्ग म्हणवणारा हा वर्ग प्रत्यक्षात देशातील सर्वात वरच्या आर्थिकस्तरातील दहा टक्के लोकांमधील आहे. (देशातील ८० टक्के लोकांची प्रति माह प्रति कुटुंब मिळकत ही २० हजार रुपयांपेक्षा कमी आहे). या तथाकथित मध्यमवर्गासाठी प्रगत देशांतील जीवनमान खूप लांबचे ध्येय नव्हते. या वर्गातील एक घटक तसे जीवनमान आधीच जगू लागला होता.

असे असले तरीही या वर्गाची स्वप्ने, आकांक्षा आणि आर्थिकदृष्ट्या त्यांच्या खाली असलेल्या ८० टक्के लोकांच्या आकांक्षा यात काही भेद नव्हता. बहुपदरी रस्त्यांवरून मोठा टोल भरून फक्त श्रीमंतांच्या मोटारीच धावणार असे नव्हते. याच रस्त्यांमुळे आणि पायाभूत सुविधांमुळे देशात परकीय गुंतवणूक येणार होती आणि या ८० टक्के लोकांना रोजगार मिळणार होते. मोठे उड्डाणपूल, बहुपदरी रस्ते, बुलेट ट्रेन ही देशाच्या आकांक्षांची, स्वप्नांची प्रतीके ठरली, मात्र आता या स्वप्नांना तडे जाऊ लागले आहेत.

शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पडणे, त्यातील कथित भ्रष्टाचाराची चर्चा सुरू होणे किंवा पावसाळ्यानंतर इतर पायाभूत सेवांच्या गुणवत्तेसंदर्भात, निर्मितीतील भ्रष्टाचारासंदर्भात प्रश्न निर्माण होणे हे ते तडे आहेत. पण भव्य स्वप्नांना एवढ्या अल्पावधीत तडे का जावेत? आपली एक आशा होती की पायाभूत सेवांची जलद निर्मिती करून आपण जागतिक भांडवलाच्या गुंतवणुकीचे सर्वात आकर्षक स्थान ठरू, कारण ते स्थान क्षी जिनपिंग यांच्या व्यक्तिकेंद्री एकाधिकारशाहीमुळे चीन गमावण्याची शक्यता आहे आणि जागतिक भांडवली बाजार चीनसाठी पर्यायाच्या शोधात आहे, पण दुर्दैवाने ते स्थान आपल्याला प्राप्तकरता आलेले नाही.दोन विशिष्ट उद्योगसमूहांना प्राधान्य देण्याचे केंद्र सरकारचे धोरण हे यामागचे एक महत्त्वाचे कारण असल्याची टीका केली जाते. इतरही कारणे आहेत. मुद्दा असा की राजकीयदृष्ट्या ताकदवान नेत्याने काही निर्णय धडाक्यात, नाट्यमय पद्धतीने घेतले आणि देशाच्या विकासाची गती वाढली, असे काही होणार नाही. मार्ग खडतर आहे.



## आजची चित्रोळी

तुला चरावयास नेऊन
तुझ्या दुधावर आम्ही तगतो !
तुला जगवूनियां जगती
तवं आधारें आम्हीं जगतो !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर.....

तसेच, पंतप्रधान महाराष्ट्र सरकारच्या 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र' योजनेचा शुभारंभ करतील. राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने आणि विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरातील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. याचबरोबर, पंतप्रधानांच्या हस्ते 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचा' शुभारंभ होणार आहे.

### महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील...

यात वीजबिल थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ४० ग्राहकांचा समावेश आहे. टिटवाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहायक अभियंते धनंजय पाटील, तुकाराम घोडविंदे, कनिष्ठ अभियंते सचिन पवार, अलंकार म्हात्रे आणि त्यांच्या टिमने ही कामगिरी केली आहे.

### रायगड किल्ल्यावरील रोपवेमध्ये अडकलेल्या...

महाडचे तहसीलदार महेश शितोळे यांनी सांगितले की, आपत्ती विभागातील अत्याधुनिक यंत्रणेमार्फत रोपवेमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितरित्या खाली काढण्यात यश आले. रोपवे सुरू असताना काही तांत्रिक अडचणींमुळे नादुरुस्ती निर्माण झाल्यास रोपवेमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यासाठी एनडीआरएफच्या प्रशिक्षित असलेल्या विशेष जवानांकडून नागरिकांना सुरक्षितपणे खाली उतरविण्यात येऊ शकते. तसेच आणीबाणीचा प्रसंग उद्भवल्यास एनडीआरएफचे पथक तत्काळ उपलब्ध होऊन परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात यश प्राप्त करेल, असा विश्वास शितोळे यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगडाच्या पायथ्याच्या रोपवे स्टेशन येथे सुमारे चार तास झालेल्या या मॉक एक्सरसाइजने पाचाड व हिरकणीवाडी परिसरातील शेकडो नागरिक रोमांचित झाले. त्यांनी चोख सुरक्षिततेची व्यवस्था पाहून समाधान व्यक्त केले. गुरुवारी सकाळपासून बंद केलेली रोपवे यंत्रणा दुपारी तीन नंतर पूर्ववत सुरू करण्यात आली.

### आत्महत्येच्या प्रयत्नात असलेल्या ३ महिलांना...

पोलिसांच्या ११२ हेल्पलाईन क्रमांकावर ही माहिती मिळाली. पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या मुलीने घराच्या दरवाजाला आतून कडी लावली होती. मात्र घुगे यांनी प्रसंगावधान दाखवून घराचा दरवाजा तोडून प्रवेश केला. ही मुलगी वॉशिंग मशीनवर चढून आत्महत्येच्या प्रयत्नात होती. पोलिसांनी तिला थांबवून तिचे समुपदेशन करून तिला आत्महत्येपासून प्रवृत्त करून तिचे प्राण वाचवले. सदर मुलीला तिच्या आईने घरगुती कारणावरून ओरडल्यामुळे तिने सदरचे पाऊल उचलले होते.

अशीच एक घटना रविवार १ सप्टेंबर रोजी घडली होती. नक्षत्र प्राइड इमारत येथे राहणाऱ्या एका दाम्पत्यामध्ये जोराचे भांडण सुरू असून तुम्ही तात्काळ मदत करा, असा कॉल सदर भांडणातील महिलेच्या भावाने उत्तर प्रदेश येथून ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर केला. कर्तव्यावरील पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी घटनास्थळी धाव घेतली. या बिल्डिंगच्या खाली लोक जमा झालेले व घरातून भांडणाचा आवाज येत होता. घुगे यांनी आत घरात प्रवेश केला असता ३७ वर्षीय महिला गॅलरीकडे पळत जाऊन १३ व्या मजल्यावरून उडी मारण्याचा प्रयत्न करत होती. मात्र घुगे यांनी चातुर्याने प्रसंगावधान दाखवून सदर महिलेचे केस पकडून तिला उडी मारताना पकडले आणि तिला वाचवले.

शुक्रवार १३ सप्टेंबर रोजी जूचंद्र येथील म्हात्रेवाडी चाळीत रात्री २४ वर्षीय विवाहित महिलेने कौटुंबिक वादातून गळफास लावल्याची माहिती रात्रगस्त अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळाराम पालकर यांना मिळाली होती. पालकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र त्या महिलेची प्रकृती गंभीर होती. तिचे शरीर थंड पडले होते. ती बोलण्याच्या स्थितीत नव्हती. पालकर यांनी तात्काळ सदर महिलेला खाजगी वाहनांमध्ये रुग्णालयात दाखल केले. तीन दिवस उपचारानंतर महिलेचे प्राण वाचले. पालकर यांनी वेळीच वैद्यकीय उपचार दिले नसते तर महिलेचे प्राण वाचले नसते.

### मुंबई-दिल्ली महामार्ग उंदरामुळे खचला,...

दरम्यान या प्रकल्पाचे दौसा येथील संचालक बलवीर यादव यांनी सांगितले की, पाणी झिरपल्यामुळे हा खड्डा पडला असावा. रस्त्यावर खड्डा पडल्याची माहिती मिळाल्यानंतर कंत्राटदाराने लगेच खड्ड्याच्या ठिकाणी बॅरिकेड लावले. तसेच खड्डाही तात्काळ भरण्यात आला, अशी माहिती यादव यांनी दिली.

### नाशिक सिव्हिल हॉस्पिटलमधील घटना

उपस्थित पोलिसांनी त्याला जवळ बोलावले. त्याची अंगझडती घेतली असता खिशात सोन्याचे मणी आणि मंगळसूत्राच्या वाट्या मिळून आल्या. यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

संबंधित कर्मचाऱ्याबाबत याआधीही अनेक तक्रारी झाल्या आहेत. सुधीर राठोड हा वर्ग चार कर्मचारी असून, तो अनेकदा गैरहजर असतो अशी तक्रार आमच्याकडे करण्यात आल्याची माहिती मुख्य प्रशासकीय अधिकारी व्ही. डी. पाटील यांनी दिली. संबंधित प्रकार चर्चेचा विषय ठरल्यानंतर परिचारिकांनी पुन्हा या कर्मचाऱ्याबाबत तक्रारी करीत त्याच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याची बदली केली जाणार असल्याची चर्चा बुधवारी हॉस्पिटलच्या वर्तुळात होती.

### आता ज्येष्ठ नागरिकांसाठी लोकलमध्ये असणार...

मात्र रेल्वे प्रशासनाकडून कार्यादेशासाठी उशीर होत असल्याचं म्हणत उच्च न्यायालयाने बुधवारी याबाबत नाराजी व्यक्त केली. येत्या दोन वर्षात केवळ ज्येष्ठ नागरिकांसाठी लोकलमध्ये स्वतंत्र डब्बा उपलब्ध करुन दिला जाईल असं रेल्वे प्रशासनाकडून न्यायालयाला सांगण्यात आलं आहे. तसंच जोपर्यंत ज्येष्ठ नागरिकांसाठी लोकल ट्रेनमध्ये जोपर्यंत स्वतंत्र डब्बा उपलब्ध होत नाही, तोपर्यंत त्यांना मालडब्यातून प्रवासाची परवानगी देण्यात येणाचे आदेश मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने रेल्वे प्रशासनाला दिले आहेत.

पुढील दोन वर्षात पश्चिम रेल्वेतील १०५ डब्यांचं आणि मध्य रेल्वेच्या १५५ डब्यांचं ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डब्यात रुपांतर होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून खंडपीठाला देण्यात आली आहे. या प्रस्तावासाठी मंजुरी मिळूनही अद्याप कार्यादेश काढला नसल्याने उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करत लवकरात लवकर हा कार्यादेश काढण्याचे आदेश रेल्वे प्रशासनाला दिले आहेत.

### मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडीमधील एक बोगदा...

त्यामुळे चाकरमान्यांचा प्रवास सुरळीत झाला होता. कशेडी घाटातील 45 मिनिटांचा वळणावळणाचा वेळ वाचला होता. इंधनाची बचतीसह वाहतूक कोंडीपासून मुक्तता मिळाली होती.

कशेडी घाटाला पर्याय असलेल्या दोन्ही बोगद्यातील खबरदारीचा उपाय म्हणून बांधकाम खात्याने विशेष काळजी घेतली. दोन्ही बोगद्यातून प्रवास करताना वाहनांचा वेग कमी ठेवण्यात आला होता. दोन्ही बोगद्यांच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा कर्मचारी नेमण्यात आले होते. त्यामुळे कशेडी घाटातून येण्याचा चाकरमान्यांचा वेळ वाचला आहे. कशेडी बोगद्याच्या अपूर्ण असणारी गटार लाईन, दर्शनी भाग, संरक्षक भिंत, अपूर्ण सिमेंट कॉंक्रीटीकरणचे कामासह लाईट, डिजिटल वेग टायमिंगची कामे पूर्ण करायची असल्याने पुन्हा बंद ठेवण्यात येणार आहे.

### वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमकडून मुख्यमंत्री...

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, की, राज्यातल्या कृषी विद्यापीठांमध्ये कृषी क्षेत्राशी संबधीत नवनवीन तंत्रज्ञानाविषयी संशोधन करण्यात येत आहे. या नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद आणि आर्थिक सुबत्ता निर्माण करत असल्याचा सार्थ अभिमान आहे. हा पुरस्कार महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रातील यशाचे आणि शाश्वत शेतीतील प्रयोग आणि प्रयत्नांचे जागतिक पटलावर प्रतिबिंबित करणारा आहे. हा पुरस्कार केवळ मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचेच नव्हे, तर महाराष्ट्राच्या कृषी नवकल्पना आणि पर्यावरणीय शाश्वततेमध्ये केलेल्या जागतिक पातळीवरील योगदानाचे सन्मान आहे. महाराष्ट्राने भारताच्या कृषी क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण स्थान राखले आहे. आपले शेतकरी, आपल्या अन्नसुरक्षेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून त्यांच्या जिद्दी आणि कष्टांनी देशाचा कणा बनले आहेत. वर्ल्ड ॲग्रिकल्चर फोरमचे उपाध्यक्ष विल्यम दार यांनी प्रस्तावनेमध्ये पुरस्काराचे स्वरूप आणि निवड पद्धती याविषयी माहिती दिली. आभार प्रदर्शन जागतीक कृषी परिषदेचे राष्ट्रीय संचालक एम.जे.खान यांनी व्यक्त केले.

# अमेरिकेतील गन संस्कृती



अमेरिकेत सध्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. दोन महिन्यांनी म्हणजे नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होणार असून या निवडणुकीत अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि ज्यो बायडेन यांच्या सरकारमध्ये उपराष्ट्राध्यक्ष राहिलेल्या मूळ भारतीय वंशाच्या कमला हॅरिस हे प्रतिस्पर्धी आहेत. दोघेही आपला प्रचार जोरदारपणे करीत आहे. दोघेही एकमेकांच्या तोडीस तोड असल्याने ही निवडणूक रंगतदार होणार आहे. दोघेही आपल्याला निवडून द्या अशी मागणी जनतेकडे करीत आहेत. निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असतानाच डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दुसऱ्यांदा गोळीबार झाल्याची बातमी आली आणि जगभर खळबळ माजली. दोन महिन्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेला हा दुसरा जीवघेणा हल्ला आहे. सुदैवाने दोन्ही वेळा त्यातून ते बचावले. १३ जुलै रोजी अमेरिकेतील पेनिसिल्व्हिया राज्यातील एका प्रचार सभेत त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. त्यावेळी ट्रम्प यांच्यावर चालवण्यात आलेली गोळी त्यांच्या कानाला चाटून गेली होती. हा हल्ला सभेपासून जवळ असलेल्या छतावरून करण्यात आला. एका वीस वर्षीय तरुणाने त्यांच्यावर हल्ला केला होता. तो हल्ला ताजाच असताना त्यांच्यावर नुकताच असाच एक जीवघेणा हल्ला करण्यात आला. हा हल्ला डोनाल्ड ट्रम्प हे वेस्ट पाम बीच येथील गोल्फ कोर्स वर गोल्फ खेळत असताना त्यांच्यावर करण्यात आला. झुडुपात लपून बसलेल्या रायन रूथ या तरुणाने त्याच्या ए के ४७ या रायफल मधून त्यांच्यावर गोळीबार केला. दैव बलवत्तर म्हणून त्यांचा यावेळीही त्यांचा जीव वाचला. माजी राष्ट्राध्यक्ष राहिलेल्या आणि राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या इतक्या मोठ्या जागतिक नेत्यांवर जीवघेणा हल्ला होणे हे अमेरिकेच्या गन संस्कृतीचे लक्षण आहे. जगासाठी जरी ही खळबळजनक घटना असली तरी अमेरिकेसाठी हे काही नवे नाही कारण याआधीही अमेरिकेच्या काही माजी राष्ट्राध्यक्षांवर असा जीवघेणा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन, जेम्स गारफील्ड, विल्यम मॅककिनले आणि जॉन एफ केनेडी यांची हत्या झाली आहे.

केवळ राजकीय नेतेच नाही तर जनता देखील या गन संस्कृतीला कायम बळी पडत आली आहे. गन संस्कुती मुळे अमेरिकेत लाखो नागरिक मरण पावले आहेत. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत मरण पावलेल्या नागरिकांची संख्या ऐकली तर आपल्याला धस्स होईल कारण अमेरिकेत गोळीबाराच्या घटनांमध्ये मागील पन्नास वर्षात १४ लाख लोकांना जीव गमवावा लागला आहे. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत दररोज सरासरी १०० लोक मरण पावतात. ही आकडेवारी थक्क करणारी आहे. कारण जागतिक महासत्ता असलेल्या देशात अशा प्रकारे लोकांचा जीव जात असेल तर ते धक्कादायकच नाही तर चिंताजनक देखील आहे. अमेरिकेत शाळेत गोळीबार झाल्याचा आणि त्यात अनेक शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याच्या बातम्या आपण नेहमीच ऐकतो, वाचतो अर्थात याला अमेरिकाच जबाबदार आहे. अमेरिकेत पूर्वीपासून गन संस्कृती अस्तित्वात आहे. दुकानातून फळे, भाजीपाला मिळतात तशा तिथे बंदुका विकत मिळतात. बंदुका चालवण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी आपल्याकडे जसा शासकीय परवाना काढावा लागतो तसा तिथे काढावा लागत नाही. तिथे बंदुका आणि काडतूस सहज मिळतात म्हणूनच तिथे गन संस्कृती उदयास आली. आता हीच गन संस्कुती अमेरिकेच्या मुळाशी आली आहे. अमेरिकेच्या या गन संस्कृतीवर अनेकांनी चिंता देखील व्यक्त केली आहे पण अमेरिकेच्या नेत्यांनी ती कधीही गांभीर्याने घेतली नाही. खुद्द डोनाल्ड ट्रम्प हे गन संस्कृतीचे मोठे समर्थक आहेत. २०१६ मध्ये त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी रिव्हॉल्वर व रायफल हे स्वसंरक्षणासाठी एक उत्तम शस्त्र असल्याचे म्हंटले होते. केवळ ट्रम्पच नाही तर अमेरिकेतील अनेक नेते हे गन संस्कृतीचे समर्थक आहेत. आता मात्र हीच संस्कुती त्यांच्या जीवावर उठली आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# ईद-ए-मिलाद सणानिमित्त जुलूस कार्यक्रम उत्साहात साजरा !



वासिंद (प्रतिनिधी )- ईद-ए-मिलादून नबी या सणानिमित्ताने येथील मुस्लिम सेवा संघ, जुलुस कमिटीच्या वतीने येथे जुलूस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षी प्रमाणे यंदाही शहापूर तालुक्यातील वासिंद येथे मोठ्या उत्साहाने साजरा होणारा जुलूस कार्यक्रम पार पडला. जुलुस कमिटीचे अध्यक्ष अनिस मुस्ताक सय्यद यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या जुलूस कार्यक्रमावेळी सर्व मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत इतर उपस्थित सर्व राजकीय, सामाजिक मान्यवरांचे स्वागत करुन सत्कार करण्यात आला. यावेळी सरबत, नाष्टा व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रम प्रसंगी आमदार दौलत दरोडा, माजी आमदार पांडुरंग बरोरा, रा. कॉ.(शरदचंद्र पवार पक्ष ) महिला जिल्हाध्यक्षा विद्याताई वेखंडे, भाजप पदाधिकारी अशोक इरनक, रा. कॉ.(शरदचंद्र पवार पक्ष ) सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष अविनाश थोरात, सरपंच राजेंद्र म्हसकर, उद्योजक अनिलजी मानिवडे, दत्ताशेठ ठाकरे, किरण जाधव, आरपीआयचे पदाधिकारी बाळकृष्ण गायकवाड, आत्माराम पगारे, रा. कॉ.(अजित पवार) गटाचे तालुकाध्यक्ष मनोहर सासे, माजी जि.प. सदस्य मोहन जाधव, काळूराम धनगर, माजी सरपंच लता शिंगवे, माजी उपसरपंच राजेंद्र भेरे, विलास पाटील, राजेश खापरे, शिवसेना (उबाठा) युवा कार्यकर्ते रविंद्र वेखंडे, शिवसेना शिंदे गट शहरप्रमुख प्रशांत ठाकरे, भाजप शहराध्यक्ष अनिल शेलार, सामाजिक कार्यकर्ते विनायक सापळे, रविंद्र चंदे, संदीप पाटील, अंनता शेलार, वासुदेव काठोळे, बाळू जगे, महेंद्र शिर्के, भास्कर जाधव, बाळू गायकर, गजानन पाटील, सुभाष रोठे, विठ्ठल सातवी,

शंकर काठोळे आदी राजकीय सामाजिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यासाठी जुलूस कमिटीचे अध्यक्ष अनिस सय्यद, कमिटी पदाधिकारी अकबर मन्यार, मिनाज शेख, सादिक सय्यद, साजिक शेख, जमिर सय्यद, इमरान शेख, अन्वर शेख, निसार शेख, अखिल शेख, शाहरुख शेख, मिराज शेख, अकबर शेख, सोनू मलिक, बल्लू शेख, लियाकत शेख आदी पदाधिकारी यांनी परिश्रम हाती घेतले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक संजीव जाधव यांनी केले.

# तीन पुस्तकांचे प्रकाशन




ठाणे -लेखक कृष्णकुमार काणेकर लिखित 'जीवनाच्या लाटांवरून', तसेच लेखिका श्रीमती शांता चव्हाण लिखित 'प्रेरणा', आणि लेखक संकल्प अभ्यंकर लिखित ' कार्तिकन ची प्रतिज्ञा' या शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या तीन पुस्तकांचे प्रकाशन शनिवार दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी सरस्वती सभागृह, मराठी ग्रंथ संग्रहालय, मामलेदार मिसळजवळ, ठाणे येथे सायंकाळी 5 वाजता होणार आहे. यावेळी प्रा. डॉ.प्रदीप ढवळ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात अभिनेते अभिजित चव्हाण उपस्थित राहणार आहेत. प्रा.प्रज्ञा पंडित प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. सूत्रसंचालन मनिष पंडित करणार आहेत. विनामूल्य असलेल्या या प्रकाशन सोहळयास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. संतोष राणे यांनी केले आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# २५ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व शाळा बंद ठेवणार !



मुरबाड (रोहित जैसवार) - राज्यातील प्राथमिक शिक्षणावर दुरगामी परिणाम करणाऱ्या अन्यायकारक शासन आदेशाविरोधात राज्यातील सर्व शिक्षक संघटना २५ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा बंद ठेवुन सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढणार असल्याचे ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान भगत यांनी सांगितले आहे.

राज्यातील सर्व संघटनांची एक महत्वपुर्ण बैठक नुकताच शिक्षक नेते संभाजी थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत, मध्यवर्ती संघटनेचे राज्याध्यक्ष केशव जाधव यांच्या अध्यक्षते खाली प्रमुख उपस्थितीत पुणे येथील शिक्षक भवनात संपन्न झाली. या बैठकीत अन्यायकारक शासन आदेशाविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षक संचमान्यतेत बाबत दि.१५/०३/२०२४ चा व कंत्राटी शिक्षक भरती बाबतचा दि. ०५/०९/२०२४ चा शासन निर्णय वाडीवस्तीवरील विदयार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने सदरचे दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा दि.२५ सप्टेंबर रोजी बंद ठेवून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्धार पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यातील सर्व संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला.

आज झालेल्या बैठकीत शासनाच्या अन्यायकारक शासन निर्णयामुळे राज्यातील १५ हजार शाळांमधील १ शिक्षक कमी होवून १५ हजार शाळांमधील सुमारे २ लाख विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असल्याने सदरचे शासन निर्णय शासनाने तात्काळ मागे घ्यावेत असे मत सर्व संघटना प्रतिनिधींनी व्यक्त केले.

बालकांच्या मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ अन्वये शिक्षक निश्चितीचे निकष सन २०११ पासून आपल्या राज्यात लागू करून १३ वर्षे झाली तरी अद्याप अधिनियमातील तरतुदीनुसार प्राथमिक स्तर इयत्ता १ ते ५ व उच्च प्राथमिक स्तर ६ ते ८ हा आकृतीबंध अध्याप लागू केलेला नाही. आकृतीबंध लागू करणेबाबत शासन निर्णयही झालेत मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने बालकाच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या अधिनियमाचे उल्लंघन होत आहे. असे असताना महाराष्ट्र शासनाकडून दि. १५/०३/२०२४ च्या शासननिर्णय द्वारे शिक्षक निश्चितीचे जाहीर केलेले निकष हे वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक आहेत.

वाडीवस्तीवर जन्म झाला म्हणून पटसंख्येअभावी शिक्षक कमी करून तेथील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणापासून वंचित ठेवणे हा त्या विद्यार्थ्यांवर अन्यायच आहे. वाडी-वस्तीवर जन्म झालेल्या विद्यार्थ्यांचा दोष तरी काय? त्याला इतर शाळांमधील विद्यार्थ्यांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळण्याचा हक्क व अधिकार बालकांच्या मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिनियमाने दिला आहे तो हक्क शासनास डावलता येणार नाही असेही मत सर्व उपस्थितांनी व्यक्त केले.

आजच्या बैठकीस शिक्षक संघाचे नेते संभाजी थोरात, शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष केशव जाधव (शिवाजी पाटील), शिक्षक समितीचे नेते उदय शिंदे व राज्याध्यक्ष विजय कोंबे, पुरोगामी शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, आदर्श शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष शिवाजीराव साखरे, आखिल भारतीय शिक्षक संघाचे किरण पाटील, शिक्षक सेनेचे चिंतामणी वेखंडे, शिक्षक भारतीचे राज्याध्यक्ष नवनाथ गेंड, पदवीधर शिक्षक संघटनेचे अनिल पलांडे, मनोज मराठे, पंजाबराव देशमुख संघटनेचे राज्याध्यक्ष प्रभाकर झोड, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य सरचिटणीस सतिश कांबळे, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे यादव पवार, शिक्षक सहकार संघटनेचे निलेश देशमुख, ऊर्दू शिक्षक संघटनेचे साजीद अहमद, जुनी पेन्शन संघटनेचे तुषार पाटील व शहाजी गोरवे, एम एड कृती समितीचे राजू सावकार जाधव, इब्टा शिक्षक संघटनेचे उतरेश्वर मोहलकर, राज्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक समन्वय महासंघ मधुकर काटोळे, एकल शिक्षक सेवा मंच राज्याध्यक्ष विकास खांडेकर, पल्लवी गायकवाड, प्रकाश घोळवे, अंकुश काळे, पवन सुर्यवंशी, एस. के. पाटील, संजय जाधव, तुषार पाटील, शशिकांत पोवार आदी राज्यातील सर्व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिला अक्षर गणेश प्रदर्शनातून सामाजिक संदेश



कल्याण (विवेक गुंजाळ): कल्याणमधील नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अक्षरगणेशातून पर्यावरण संदेश दिला असून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या अक्षरगणेश चित्र प्रदर्शनाचे आयोजन आज करण्यात आले होते. छत्रपती शिक्षण मंडळाच्या नूतन विद्यालयात विद्यार्थ्यांनी गणपती सुट्टीत स्वतःच्या नावाचा अक्षरगणेश तयार केला. त्यावर पर्यावरण विषयी झाडे लावू झाडे जगवू, मी पर्यावरण स्नेही, स्वच्छ भारत आरोग्य संपन्न भारत, प्लास्टिकचा वापर टाळा, निसर्ग माझा मित्र, कचरा करू कमी आरोग्याची मिळेल हमी, पर्यावरण संवर्धन काळाची गरज, कापडी पिशवी घरोघरी पर्यावरण रक्षण करी. असे सामाजिक संदेश देणारे घोषवाक्य लिहिली. या स्तुत्य उपक्रमासाठी शाळेचे कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या अक्षर गणेश प्रदर्शन शाळेच्या हॉलमध्ये भरविले असून या प्रदर्शनाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद यांनी केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेले स्वतःच्या नावातून अक्षरगणेश अतिशय कल्पकतेने तयार करून सुरेख रंगसंगतीत रंगकाम केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# वायले नगर येथे मण्यार सापाला जीवनदान



कल्याण (गणेश बागडे): कल्याण पश्चिमेतील वायले नगर, निळकंठ पार्क बिल्डिंग नंबर १४ मध्ये छोट्या फटीत विषारी असलेला मण्यार (कॉमन क्रेट) साप होता. सापाला बघून खूप गर्दी झाली होती. तेथे सर्पमित्रांना बोलावले होते परंतु गडबड गोंधळ मुळे साप जात होता. तेथेच राहणारे व सर्पमित्र म्हणून कार्य करणारे सुहास पवार यांनी तत्काळ सापाची सुटका केली व जेष्ठ सर्पमित्र दत्ता बोंबे व हितेश करंजकर यांच्या सहकार्याने निसर्गमुक्त करणारं असल्याचे स्थानिकांनी रहिवाशांनी सांगितले. मण्यार साप हा जहाल विषारी असून निशाचर म्हणजे रात्रीच्या वेळी शिकार करण्यास बाहेर पडतो.


# सार्वजनिक विश्वकर्मा पूजा संपन्न

कल्याण (आकाश कांबळे) : ओम विश्वकर्मा समाज संस्थेच्या वतीने कल्याणनजीकच्या आंबीवली येथे सार्वजनिक विश्वकर्मा पूजेचे आयोजन केले होते. मंगळवारी भगवान विश्वकर्मा यांच्या मुर्तीची पूजा आणि स्थापना करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. सुमारे 4 हजार भाविकांनी याचा लाभ घेतला.

# डोंबिवलीतील विकास कामांसाठी नगरविकास विभागाकडून 55 कोटीचा निधी, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे प्रयत्न

डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) – आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर डोंबिवली शहर परिसरातील विविध प्रकारची विकासकामे मार्गी लागावीत यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी राज्याच्या नगरविकास विभागाकडून डोंबिवली शहरासाठी विशेष मुलभूत सोयी सुविधांतर्गत ५५ कोटीचा निधी मंजूर करून आणला आहे. डोंबिवली पूर्व, पश्चिम भागातील एकूण २१५ कामे या निधीतून केली जाणार आहेत.

या विकास कामांमध्ये सिमेंट कॉंक्रिट रस्ते, नाला बंदिस्ती, गटार, पायवाटा, बगिचा, उद्यान विकसित करणे, ज्येष्ठ नागरिक कट्टा, विरंगुळा केंद्र, भटक्या मृत प्राण्यांसाठी विद्युत दाहिनी उभारणे, मुख्य चौक सुशोभिकरण अशी अनेक प्रकारची कामे केली जाणार आहेत. डोंबिवली शहरातील काही रस्ते सिमेंट कॉंक्रिटचे करण्यात आले असले तरी शहरांतर्गत काही रस्ते हे डांबरीचे आहेत. वाढत्या वस्तीचा विचार करून हेही रस्ते कॉंक्रिटचे होणे गरजेचे आहे. याशिवाय शहरातील वाढत्या वस्तीचा विचार करून नागरिकांना मनोरजंनाची ठिकाणी विकसित करण्याची आवश्यकता आहे. माणकोली पूल, टिटवाळा ते काटई बाह्य वळण रस्ता पूर्ण क्षमतेने सुरू झाला तर शहरांतर्गत पोहच रस्ते सुस्थितीत असणे आवश्यक आहे. हे मुद्दे मंत्री चव्हाण यांनी शासनाकडे मांडले. दूरगामी विचार करून सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे डोंबिवली शहरासाठी मूलभुत सोयी सुविधांसाठी निधी देण्याची मागणी केली होती. डोंबिवली शहर विकासाचा विचार करून शासनाने ही मागणी तात्काळ मान्य केली. नगरविकास विभागाने डोंबिवली शहरासाठी ५५ कोटीचा निधी देण्याचा निर्णय घेतला.



दोन टप्प्यांमध्ये ही कामे केली जाणार आहेत. २५ कोटीच्या निधीतून १०० विकास कामे आणि २५ कोटीच्या निधीतून ११५ विकास कामे केली जाणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कल्याण डोंबिवली पालिकेने निवीदा प्रक्रिया राबवून ही कामे करायचे आदेश आहेत. या कामांमुळे डोंबिवली शहराचा चेहरामोहरा बदलणार आहे.

मागील काही वर्षापासून पावसाळा आला की डोंबिवलीतील रस्त्यांची दुर्दशा होते. काही रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीए, एमएसआरडीसी यांच्या नियंत्रणाखाली आहेत. हे रस्ते या यंत्रणाकडून वेळीच सुस्थितीत केले जात नसल्याने त्याचा त्रास डोंबिवलीतील प्रवाशांना होतो. हे दुखणे कायमचे दूर करण्यासाठी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी मुख्य वर्दळीच्या रस्त्यांसह अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरणाचे करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. पक्षीय भेद न ठेवता डोंबिवलीतील प्रत्येक प्रभागात ही कामे केली जाणार आहेत. गुरुवारी मंत्री चव्हाण यांचा वाढदिवस असल्याने त्यांनी शहरासाठी दिलेली ही भेट मानली जात आहे.

कल्याण डोंबिवली पालिकेतील विकास कामांसाठी निधीची उपलब्धता पाहता डोंबिवलीतील महत्वाची विकास कामे पूर्ण होणे शक्य नव्हते. त्यामळे डोंबिवलीतील विकास कामांसाठी शासनाकडे निधीची मागणी केली होती. ही मागणी नगरविकास विभागाने तात्काळ मान्य केली. शहरासाठी आपल्या प्रयत्नातून ५५ कोटीचा निधी उपलब्ध झाला आहे. या कामांसाठीची निवीदा प्रक्रिया पार पडली की तात्काळ ही कामे सुरू केली जातील.

# सिव्हील रुग्णालयातील डायलिसिस सेंटर मध्ये सहा महिन्यात १००० सेशन !



ठाणे ( रोहित जैसवार) -: ठाणे सिव्हील रुग्णालयात किडनी रुग्णांसाठी आधारवड ठरताना दिसून येत आहे. रुग्णालयातील डायलिसिस सेंटर मध्ये गेल्या सहा महिन्यात रुग्णांचे एक हजार सेशन झाले असून, आता दोन सत्रात सुरू झालेल्या या सेंटर मध्ये जास्तीत जास्त रुग्णांनी फायदा घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. रक्तातील अशुद्ध घटक बाहेर फेकण्याच नैसर्गिक काम किडनी मार्फत होत असल्याने, माणसासाठी किडनी खूप महत्वाचे कार्य करत असते. मात्र किडनीची प्रक्रिया मंदावल्यावर प्रत्येक व्यक्तीला डायलिसिस करणे ही गरज बनते. सर्वसामान्यांसाठी नियमित डायलिसिस खर्च परवडणारा नसतो. त्यामुळे अनेकांसाठी किडनीचा त्रास नकोसा होतो. परंतु अशा रुग्णांसाठी ठाणे सिव्हील रुग्णालयात विशेष कक्ष तयार केला आहे. सुसज्ज असणाऱ्या डायलिसिस सेंटर मध्ये दर दिवशी रुग्णांवर उपचार होत आहेत. गेल्या सहा महिन्यात एक हजार डायलिसिस सेशन झाले असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली. डायलिसिस सेंटर मध्ये एकूण १४ मशीन असून, या पैकी एका सत्रात नऊ रुग्ण उपचार घेऊ शकतात. रुग्णांची संख्या वाढली तर उर्वरित मशीन उपयोगात आणल्या जाणार आहेत. अद्यावत ठेवलेल्या डायलिसिस सेंटर पुढील टप्प्यात दोन ते तीन सत्रात सुरू ठेवले जाणार आहे. रक्तातील जे दूषित पदार्थ साठून राहतात ते बाहेर काढण्याची प्रक्रिया म्हणजे डायलिसिस. आपली किडनी हेच काम नैसर्गीरित्या करत असते. किडनी जेव्हा रक्त शुद्धीकरणाचे काम थांबवते त्यावेळी डायलिसिसची आवश्यकता भासते. डायलिसिस सेंटर मध्ये जिल्ह्याच्या विविध भागातून रुग्ण उपचार घेण्यासाठी येत आहेत.

# ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेतील निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी न दिल्याने कर्मचारी हवालदिल...

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेची वारंवार भेट घेऊन देखील देणी मिळत नसल्याने कर्मचारी चिंतेत

ठाणे ( सूचित शिंदे ) -: ठाणे महानगरपालिकेतील परिवहन सेवेमध्ये 2016 पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची थकीत देणे शासन दरबारी प्रलंबित आहे. महागाई भत्ता , सहावा वेतन आयोग यांसारख्या विविध रकमेचा समावेश असून एकूण कोट्यावधीची रक्कम महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे थकीत आहे. आयुष्यभर परिवहन सेवेमध्ये कष्ट केल्यानंतर सरते शेवटी मिळणारी आयुष्याची पुंजी अद्याप न मिळाल्याने निवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्य आता हवालदिलं झाले आहेत. वारंवार शासन दरबारी पत्रव्यवहार करून देखील त्यांची थकीत देणे अदा न केल्यामुळे गुरुवारी सर्व निवृत्त कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेतली. तसेच लवकरात लवकर थकित देणे द्यावी अशी मागणी यांवेळी करण्यात आली आहे.

वारंवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील भेट घेतली असता फक्त आश्वासन दिले जाते. परिवहन विभाग ठाणे महापालिकेचाच एक भाग असून आमच्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. यावेळी कर्मचारी भावूक झाले. उदरनिर्वाह करायचा कसा असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. त्यामुळे कर्मचारी आक्रमक झाले.

# आयरे गाव तलावाची स्वच्छता .......



डोंबिवली (सम्यक कासारे) - आज दिनांक 18 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 10 वाजता डोंबिवली पूर्वेतील आयरे गांव तलाव " स्वच्छता ही सेवा" या केंद्र शासनाच्या उपक्रमांतर्गत स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये डोंबिवलीतील टिळकनगर विद्यामंदिरचे विद्यार्थी, प्रगती महाविद्यालयाचे विद्यार्थी, पर्यावरण दक्षता मंडळाचे स्वयंसेवक, महानगारपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी वर्ग तसेच वॉर्ड ऑफिसर श्री कुमावत साहेब उपस्थित होते. सर्व उत्साही स्वयंसेवकांनी तलाव परिसराची संपूर्ण स्वच्छता केली. तलावाच्या आतील प्लास्टिक, थर्माकोल, इतर सुका कचरा पाण्याबाहेर काढण्यात आला.

# पोलिसांचा राजकीय हत्यार म्हणून वापर डॉ.जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

## बिहार जळीतकांड प्रकरणी नितीशकुमार यांनी राजीनामा द्यावा

ठाणे (रोहित जैसवार)-: भिवंडी येथे धार्मिक दंगल माजविण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न होता. मात्र, हा प्रयत्न पोलीस उपायुक्तांनी हानून पडला. त्यामुळेच त्यांची बदली करण्यात आली आहे, असा आरोप करून पोलिसांचा सत्ताधाऱ्यांकडून राजकीय हत्यार म्हणून वापर केला जात असल्याची टीका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा आ. डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत केली.


भिवंडीतील घुंघटनगर येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची गणेशमूर्ती विसर्जनासाठी जात असताना धार्मिक विद्वेष पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावेळेस पोलिसांनी हस्तक्षेप करीत लाठीचार्ज केला. या घटनेनंतर पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.

या संदर्भात डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले की, आपणाला दोन्ही समाजातील सुजाण नागरिकांनी माहिती दिली की, जर या पोलीस उपायुक्तांनी मध्ये उडी घेतली नसती तर भिवंडीत दंगल झाली असती; दंगल रोखणाऱ्या अधिकाऱ्याला असे बक्षिस दिले जात असेल तर संपूर्ण पोलीस दलाचे मनोबल खच्चीकरण होणार नाही तर काय होईल? आपणाला अंतर्गत माहिती अशी मिळत आहे की, या बदलीला पोलीस दलातील अनेकअधिकाऱ्यांनी प्रचंड विरोध केला आहे. तेथील बीजेपीचा एक राजकीय नेता



ही दंगल घडवू इच्छित होता. दंगल झाली नाही आणि त्याचे परिणाम म्हणून पोलीस उपायुक्तांची बदली करण्यात आली. याचा अर्थ स्पष्ट आहे की या सरकारला आगामी निवडणुकीत पराभव पत्करावा लागणार असल्याचे सर्वे आले आहेत. त्यामुळेच धार्मिक ध्रुवीकरण करण्यासाठी काहीही करून सत्ताधारी वर्गाला दंगल भडकवायची आहे. पोलिसांना हत्यार म्हणून पुढे पाठवायचे आणि दंगल घडवायची, हे तत्व सरकारचे आहे . मी पोलिसांनाच विनंती करेन की, तुम्ही राजकीय हत्यार बनू नका. या सरकारला दंगल घडवूनच निवडणूक जिंकायची आहे. त्यांच्या हातचे बाहुले बनू नका. आपल्या देशातील हिंदूंना कधीच आक्रमक हिंसा आवडत नाही. त्यामुळे येथे शांततेत जनजीवन चालू आहे. एकदा दंगल झाली की दंगलीनंतर जी सामाजिक द्वेषाची भिंत उभी राहते; ती पडायला नंतर 20 - 25 वर्षे लागतात, समाजामध्ये जेव्हा विद्वेष पसरतो तेव्हा समाजामध्ये जो आपलेपणा असतो, तो गायब होतो. याचे भान ठेवण्याऐवजी निवडणुका जिंकण्यासाठी दंगली माजवल्या जात आहेत. काल बिहारमधील नेवाडा गावात 80 दलितांच्या झोपड्या जाळण्यात आल्या. एनिहिलेशन ऑफ कास्ट या ग्रंथातून डॉ. बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेचे निर्मूलन ही संकल्पना मांडली होती. पण, आताची परिस्थिती पाहता, जाती व्यवस्थेचे उच्चाटन तर होताना दिसत नाहीच; किंबहुना, जातीयवाद अधिकच वाढताना दिसतोय आणि त्याला खतपाणी घातले जातेय. आज जर भाजप 400 पार झाली असती तर काय झालं असतं, याचा विचार करा ! दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लीम यांच्या मदतीला संविधानही आले नसते.

# एकाच मालिकेतील आणखी एका अभिनेत्रीने दिली गुड न्यूज



एकापाठोपाठ एक टीव्ही अभिनेत्री गुड न्यूज देत आहेत. काही दिवसांपूर्वी 'साथ निभाना साथिया' फेम देवोलीना भट्टाचार्जीने ती आई होणार असल्याची बातमी दिली. त्यानंतर 'कुंडली भाग्य' फेम श्रद्धा आर्याने लवकरच पहिल्या बाळाचं स्वागत करणार असल्याची माहिती सोशल मीडिया पोस्ट करून दिली. त्यानंतर आता 'कुंडली भाग्य'मधील आणखी एका अभिनेत्रीने आनंदाची बातमी दिली आहे. अभिनेत्री सना सय्यद लग्नानंतर तीन वर्षांनी आई होणार आहे. तिने बेबी बंपचे फोटो शेअर केले आहेत.

सना सय्यदने नुकतेच तिचे पतीबरोबरचे काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले आहे. यामध्ये तिचा व तिचा पती इमाद दोघेही पोज देताना दिसत आहेत. फोटोमध्ये सना जीन्स व शर्ट घालून दिसत आहे. सनाने बेबी बंप फ्लाँट करत पोज दिल्या आहेत. फोटोंमध्ये इमाद व सना बेबी बंपबरोबर रोमँटिक पोज देत आहे. त्यांचे हे फोटो पाहून चाहते दोघांवर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत.

सनाने तीन वर्षांपूर्वी केलं लग्न

सना सय्यदने गरोदर असल्याने मे २०२४ मध्ये 'कुंडली भाग्य' ही मालिका सोडली. नंतर सनाची जागा अद्रिजा रॉयने घेतली. सना व तिचा पती इमाद यांनी बराच काळ एकमेकांना डेट केल्यावर २०२१ मध्ये लग्न केलं. दोघे कॉलेजच्या दिवसांपासून एकमेकांना ओळखतात. सनाने 'कुंडली भाग्य', 'कुमकुम भाग्य', 'दिव्या दृष्टी', 'स्प्लिट्सविला' आणि स्पाय बहू सारख्या मालिकांमध्ये काम केलं आहे.

श्रद्धा आर्याने नुकतीच दिली गुड न्यूज

'कुंडली भाग्य' फेम श्रद्धा आर्याने रविवारी (१५ सप्टेंबर) इन्स्टाग्रामवर एक सुंदर व्हिडीओ शेअर करून गरोदर असल्याची बातमी चाहत्यांना दिली. अभिनेत्री श्रद्धा आर्या व राहुल नागल यांनी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. श्रद्धा अभिनयक्षेत्रात काम करत आहेत, तर तिचा पती राहुल नौदल अधिकारी आहे. ३७ वर्षांची श्रद्धा लवकरच आई होणार आहे. श्रद्धापाठोपाठ आता सना सय्यदनेही गुड न्यूज दिली आहे.

# बांगलादेश कसोटीत रोहित शर्माचा मास्टरस्ट्रोक, तीन विकेट्स गमावल्यानंतरही भारताने कसा सावरला डाव?







भारत विरुद्ध बांगलादेश कसोटी सामन्याची सुरुवात भारतीय संघासाठी फारच खराब झाली. रोहित शर्मा, विराट कोहली आणि शुबमन गिलसारखे फलंदाज पहिल्या तासात स्वस्तात बाद होऊन माघारी परतले. खेळपट्टीकडून गोलंदाजांना खूप चांगली मदत मिळत होती, ज्याचा गोलंदाजांनी चांगला फायदा करून घेतला. बांगलादेशच्या संघाने जवळपास भारतीय संघाला बॅकफूटवर आणले होते. भारताने तिन्ही टॉप फलंदाज अवघ्या ३३ धावांत बाद झाले होते. बांगलादेशचा संघ या विकेट्सचा आनंद साजरा करत असताना रोहित शर्माने पॅव्हेलियनमधून मास्टरस्ट्रोक खेळला.

बांगलादेशचा संघ तीन विकेट घेऊन भारतीय क्रिकेटला बॅकफूटवर टाकण्याचा आनंद साजरा करत असताना कर्णधार रोहित शर्माने अशी चाल खेळली की बांगलादेशच्या आनंदावर विरजण पडले आणि भारताचा डाव पुन्हा रूळावर आला. खेळपट्टीवर उजव्या हाताच्या फलंदाजांना फलंदाजी करताना अडचणी येत होत्या आणि डाव्या हाताचे फलंदाज सहज धावा काढत होते. भारतीय संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला उतरला. पण रोहित शर्मा ६ धावा करत शुबमन गिल ७ चेंडूत एकही धाव न घेता बाद झाला तर विराट कोहली एका चौकारासह ६ धावा करत बाद झाला. यशस्वी जैस्वाल मात्र मैदानात पाय रोवून उभा होता. आथा तीन विकेट गेल्यानंतर केएल राहुल पाचव्या नंबरवर फलंदाजीला उतरत होता. पण इथेच रोहितने मास्टरस्ट्रोक खेळत ऋषभ पंतला फलंदाजीला पाठवले.

भारताचा माजी खेळाडू पार्थिव पटेलने रोहितच्या या निर्णयावर सांगितले की, "मी आश्चर्यचकित झालो. सामन्यांमध्ये सहसा कर्णधार आणि कोच मैदानावर डावखुरा आणि उजव्या हाताचा फलंदाज असं कॉम्बिनेशन ठेवण्याला प्राधान्य देतात. त्यामुळे मैदानावर आधीच डावखुरा फलंदाज यशस्वी जैस्वाल उपस्थित होता आणि उजव्या हाताचा फलंदाज म्हणून केएल राहुल होता. यानंतर केएल राहुल मैदानात येण्याची अपेक्षा होती, पण ऋषभ पंतला आधी का पाठवलं या प्रश्नांची उत्तर पंतने त्याच्या खेळीतून दिली."

पुढे पार्थिव पटेल म्हणाला, "मला खात्री आहे की राहुलआधी पंतला पाठवणं यामागे काहीतरी रणनिती होती, बांगलादेशचे गोलंदाज डाव्या हाताच्या फलंदाजांना चांगली गोलंदाजी करत नव्हते. मला वाटते की केएल राहुलच्या पुढे ऋषभला पाठवण्यामागे हीच योजना असू शकते."

एक प्रकारे हा कर्णधार रोहित शर्माचा हा मास्टरस्ट्रोक होता. खरे तर पहिल्या तासात बाद झालेले तीनही भारतीय फलंदाज उजव्या हाताचे फलंदाज होते. सलामीला आलेला यशस्वी जैस्वाल चांगली फलंदाजी करत होता. अशा स्थितीत उजव्या हाताच्या केएल राहुलच्या जागी डावखुरा ऋषभ पंतला पाठवणे फायदेशीर ठरले. तीन गडी बाद झाल्यानंतर थोडे दडपणाखाली असणाऱ्या भारतीय संघाला या दोघांनी संकटातून बाहेर काढले.

# सर्वाधिक विक्री होणारा टॉपचा TV आणा घरात! बजाज फिनसर्व्हचा सोपा EMI पर्याय

टेलिव्हिजन म्हणजे विलासी वस्तू असा समज एकेकाळी होता. हा टेलिव्हिजन आता आपल्या जीवनाचा एक आवश्यक भाग बनला आहे. मग ते मनोरंजनासाठी असो, बातम्या असो किंवा दिवसातील गडबड संपल्यावर आराम म्हणून पाहण्याचा भाग असो, एक चांगला टीव्ही आपला दृश्य अनुभव वाढवू शकतो. बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक पर्यायांमुळे, योग्य टीव्हीची निवड करणे कठीण होते. खरेदी करण्यापूर्वी संशोधन करणे आणि तुमच्यासाठी आवश्यक असलेली वैशिष्ट्ये समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आता बजाज फिनसर्व्हकडून सोप्या ईएमआय पर्यायांसह बजाज मॉलवर सर्वाधिक विक्री होणारा टीव्ही तुम्हाला घरात आणता येणार आहे, ज्यामुळे तुमची खरेदी परवडणारी आणि सोयीस्कर होईल.

बजाज मॉलवर सुयोग्य टीव्हीचा शोध घ्या

तुमचा टीव्ही खरेदीचा प्रवास सुरू करण्यासाठी बजाज मॉल हा एक उत्कृष्ट मंच आहे. तुम्ही वेगवेगळ्या ब्रँडमधील टेलिव्हिजनच्या विस्तृत श्रेणीचा शोध घेऊ शकता. त्यांची वैशिष्ट्ये, किंमती आणि ग्राहकांच्या पुनरावलोकनांची तुलना करणे शक्य होते. स्क्रीनचा आकार, रेझोल्यूशन (एचडी, फुल एचडी, स्क्रीनचा आकार, रेझोल्यूशन (एचडी, फुल एचडी, 4के) स्मार्ट टीव्ही क्षमता, रिफ्रेश रेट, ध्वनी गुणवत्ता आणि ब्रँड प्रतिष्ठा यासारख्या घटकांचा विचार करता येणार आहे. खरेदी करण्यासाठी जवळच्या बजाज फिनसर्व्ह पार्टनर स्टोअरमध्ये जा. बजाज फिनसर्व्ह स्वस्त ईएमआय आणि शून्य डाऊन पेमेंट ऑफरसह सोयीस्कर वित्तपुरवठा पर्याय देते. ज्यामुळे तुमच्या स्वप्नातील TV घरी आणणे सोपे होते.

ही सर्वोत्तम विक्रीची TV मॉडेल लक्षात घ्या

येथे काही सर्वाधिक विक्री होणारे टीव्ही मॉडेल आहेत, ज्यांचा तुम्ही त्यांच्या किंमती आणि अंदाजित ईएमआयसह बजाज मॉलवर विचार करू शकताः

मॉडेल बजाज मॉलवरील किंमती ईएमआय

TCL 108 सेमी (43 इंच) 4K अल्ट्रा एचडी एलईडी स्मार्ट टीव्ही ब्लॅक (43C645) -रु. 28,990 रु. 2,416/महिना

SANSUI 140 सेमी



(55 इंच) अल्ट्रा एचडी (4K) एलईडी स्मार्ट टीव्ही मिस्टीक ग्रे (JSW55ASUHD) -रु. 34,990 रु. 2,916/महिना

LG 81.28 सेमी (32 इंच) एचडी रेडी एलईडी स्मार्ट टीव्ही डार्क आयरन ग्रे (32LM-560BPTC) -रु. 17,490 रु. 972/महिना

Xiaomi X Pro मालिका 139 सेमी (55 इंच) 4K अल्ट्रा एचडी एलईडी टीव्ही मेटॅलिक ग्रे (स्मार्ट टीव्ही X Pro 1.38m 55) -रु. 47,999 रु. 4,000/महिना

Panasonic 108 सेमी (43 इंच) 4K फूल एचडी स्मार्ट एलईडी टीव्ही ब्लॅक (TH-43MS550DX) -रु. 28,990 रु. 1,933/महिना

Croma 140 सेमी (55 इंच) 4K अल्ट्रा एचडी एलईडी वेबओएस टीव्ही गुगल असिस्टंट रु. 33,990 रु. 3,399/महिना

Sony Bravia 139 सेमी (55 इंच) 4K अल्ट्रा एचडी स्मार्ट एलईडी टीव्ही ब्लॅक (KD-55X75L) रु. 64,890 रु. 2,995/महिना

बजाज फिनसर्व्हसोबत सुलभ फायनान्सचा लाभ घ्या

तुमचे बजेट नसल्यास बजाज फिनसर्व्हद्वारे टीव्ही खरेदी अधिक योग्य ठरते. बजाज मॉलमधून तुमचे पसंतीचे मॉडेल निवडल्यानंतर, तुमची खरेदी पूर्ण करण्यासाठी फक्त बजाज फिनसर्व्ह पार्टनर स्टोअरमध्ये जा. बजाज फिनसर्व्हचे लवचिक वित्तपुरवठा पर्याय तुम्हाला परवडणाऱ्या ईएमआयवर खर्चाची परवानगी देतात. तुम्हाला आगाऊ मोठी रक्कम भरावी लागणार नाही याची काळजी घेतली जाते. याव्यतिरिक्त, तुम्ही स्वत:च्या आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेणारी परतफेडीची मुदत निवडू शकता. ज्यामुळे खरेदी प्रक्रिया तणावमुक्त होईल. हे वित्तपुरवठा पर्याय टेलिव्हिजनसह विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनांवर उपलब्ध आहेत.

बजाज फिनसर्व्हसह खरेदीचा लाभ

जेव्हा तुम्ही बजाज फिन्सर्व्हद्वारे खरेदीची निवड करता, तेव्हा विविध फायदे तुमच्यासाठी खुले होतात. ज्यामुळे तुमचा खरेदीचा अनुभव सोपा आणि अधिक फायदेशीर होतोः

परवडण्याजोगी किंमतः बजाज फिनसर्व्ह पार्टनर स्टोअर्स सर्वाधिक विक्री होणाऱ्या टीव्हीवर स्पर्धात्मक किंमत देतात, ज्यामुळे तुम्हाला तुमच्या अंदाजपत्रकाला साजेशा किंमतीत परिपूर्ण टीव्ही शोधता येतो.

सुलभ ईएमआय: बजाज फिनसर्व्हच्या वित्तपुरवठा योजनांसह, तुम्ही लवचिक परतफेड पर्यायांचा आनंद घेऊ शकता आणि सोप्या ईएमआयवर तुमच्या टीव्हीची किंमत वाढवू शकता.

शून्य डाउन पेमेंटः निवडलेले टीव्ही मॉडेल शून्य डाउन पेमेंट पर्यायांसह येतात, ज्यामुळे तुम्हाला काहीही आगाऊ न देता तुमचा नवीन टीव्ही घरी आणता येतो.

विस्तृत श्रेणी आणि सुलभताः अनेक बजाज फिनसर्व्ह भागीदार दुकानांमध्ये उपलब्ध असलेल्या टीव्हीच्या विस्तृत निवडीसह, तुम्ही तुमच्या पाहण्याच्या प्राधान्यांनुसार योग्य मॉडेल सहज शोधू शकता.

विशेष व्यवहार आणि कॅशबॅकः जेव्हा तुम्ही बजाज फिनसर्व्हच्या वित्तपुरवठा उपायांचा वापर करून टीव्ही खरेदी करता तेव्हा विशेष ऑफर, कॅशबॅक आणि हंगामी सवलतींचा आनंद घ्या.

विनामूल्य होम डिलिव्हरीः निवडक टीव्ही खरेदीमध्ये विनामूल्य होम डिलिव्हरी समाविष्ट आहे, ज्यामुळे तुमचा नवीन टीव्ही कोणत्याही अडचणीशिवाय घरी आणणे अधिक सोयीचे बनते.

गरजेनुसार योग्य टीव्ही मिळेल

जर तुम्ही सर्वाधिक विक्री होणारा टीव्ही खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर बजाज मॉल बजाज फिनसर्व्हकडून उत्कृष्ट वित्तपुरवठा पर्यायांसह मॉडेल्सची विस्तृत श्रेणी देऊ करते.

## दिनविशेष

**घटना**

२०१७: मारिया चक्रीवादळ या वादळामुळे पोर्तो रिकोमध्ये किमान २,९७५ लोकांचे निधन.

२००१: दहशतवादाविरुद्ध युद्ध - अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी दहशतवादाविरुद्ध कारवाई करण्यासाठी लढा देण्याची घोषणा केली.

१९९०: दक्षिण ओसेशिया देशाने जॉर्जियापासून आपले स्वातंत्र्य घोषित केले.

१९७७ : संयुक्त राष्ट्र - व्हिएतनामचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.

१९६५ : बुर्कीची लढाई - १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान भारतीय सैन्याने डोगराई ताब्यात घेतले.

१९४६: कान्स फिल्म फेस्टिव्हल पहिले कान्स फिल्म फेस्टिव्हल आयोजित केले गेले.

१९४२: युक्रेनमधील होलोकॉस्ट - दोन दिवसांत किमान ३ हजार ज्यू लोकांची हत्या केली.

**जन्म**

१९४९: प्रयार गोपालकृष्णन भारतीय राजकारणी, केरळचे आमदार (निधन: ४ जून २०२२)

१९४९ : महेश भट्ट - चित्रपट दिग्दर्शक

१९४६: मार्कंडेय काटजू - भारतीय वकील आणि न्यायमूर्ती

१९४४ : रमेश सक्सेना क्रिकेटपटू

१९४२ : राजिंदर गोयल भारतीय क्रिकेटपटू, रणजी ट्रॉफीमध्ये सर्वाधिक विकेट घेणारे (निधनः २१ जून २०२०)

१९३४ : सोफिया लॉरेन इटालियन चित्रपट अभिनेत्री

**मृत्यू**

२०१५ : जगमोहन दालमिया भारतीय उद्योजक, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (BCCI) २६वे अध्यक्ष (जन्म: ३० मे १९४०)

२०१४ : अशोक केळकर भाषाशास्त्रज्ञ तसेच साहित्य समीक्षक पद्मश्री, साहित्य अकादमी पुरस्कार (जन्म: २२ एप्रिल १९२९)

१९९७ : अनुप कुमार चित्रपट अभिनेते (जन्म: ९ जानेवारी १९२६)

१९९६: रुबेन कामांगा - झांबिया देशाचे १ले उपाध्यक्ष, सैनिक आणि राजकारणी (जन्म: २६ ऑगस्ट १९२९)

१९९६: दगडू मारुती पवार कवी, कथाकार, सामिक्षक, विचारवंत

१९७९: लुडविक स्वोबोदा - चेकोस्लोव्हेकियाचे राष्ट्राध्यक्ष

१९३३ : ॲनी बेझंट - थिऑसॉफिस्ट आणि भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या (जन्म: १ ऑक्टोबर १८४७)

## राशि भविष्य

**मेष**
अध्यात्मिक आणि भौतिक लाभासाठी ध्यानधारणा आणि योगाचा वापर करू शकता. आज कुणी न सांगता एक देणेदार तुमच्या अकाऊंट मध्ये पैसे टाकू शकतो हे पाहून तुम्हाला आनंद ही होईल आणि आश्चर्य वाटेल. सुखद आणि अनोखी संध्याकाळ साजरी करण्यासाठी तुमच्या घरी नातेवाईकांची गर्दी होईल.

**वृषभ**
कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि तुमच्या मौजमजा, विरंगुळयासाठी वेळ खर्च करा. आज धन लाभ होण्याची शक्यता आहे परंतु, असे होऊ शकते की, आपल्या रागीट स्वभावाच्या कारणाने तुम्ही पैसा कमावण्यात सक्षम होणार नाही.

**मिथुन**
तुम्हाला एखाद्या धार्मिक स्थळी जाण्याची इच्छा होईल. त्यासाठी तुम्ही धार्मिक स्थळी जाऊन ज्ञानी-योगी-दैवी व्यक्तीला भेटून त्यांच्यादजवळून ज्ञान मिळवाल, आशीर्वाद मिळवाल. काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल.

**कर्क**
तुमच्या जोडीदाराचे धाडस आणि निष्ठेमुळे तुम्हाला आनंद मिळेल. जीवनाच्या वाईट कामात पैसा तुमच्या कामी येईल म्हणून, आज पासूनच आपल्या पैश्याची बचत करण्याचा विचार करा अथवा तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो. मित्रांकडून सायंकाळी एखादा रोमांचक प्लॅन आखल्यामुळे आजचा दिवस खूपच सुंदर असेल.

**सिंह**
तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय. त्यामुळे शंका, निरुत्साह, अश्रद्धा, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल. घरातील गरजांना पाहून आज तुम्ही आपल्या जीवनसाथी सोबत काही किमती वस्तू खरेदी करू शकतात ज्यामुळे आर्थिक परिस्थिती थोडी बेताची होऊ शकते.

**कन्या**
आपल्यासाठी काय चांगले आहे हे फक्त तुम्हाला स्वत:लाच माहीत आहे. त्यामुळे ठामपणाने, धाडसी आणि जलद निर्णय घेऊन परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवा. आर्थिक स्थितीतील बदल हे नक्कीच होणार आहेत. शाळेचा प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी मुलांना तुमच्या मदतीची गरज भासेल.

**तूळ**
आपल्या जीवनसाथीचा आनंददायी प्रेमळ मूड तुमचा दिवस उजळून टाकेल. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून आजच्या दिवशी तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते आणि तुम्ही कुठल्या मोठ्या अडचणींमधून निघू शकतात.

**वृश्चिक**
आज घरी बसून आराम करण्याची गरज आहे - आणि आवडते छंद जोपासा व आनंद वाटेल अशा गोष्टी करा. आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे - परंतु तुमच्या हातातून पैसे सांडू देऊ नका. जे तुमच्यावर प्रेम करतात, ज्यांना तुमची काळजी आहे अशा लोकांशी व्यवस्थित वागा.

**धनु**
आज तुमची प्रकृती फारशी बरी नसल्यामुळे तुम्हाला तुमच्या कामावर लक्ष केंद्रीत करणे जड जाईल. ज्या लोकांनी अतीत मध्ये आपली धन गुंतवणूक केली होती आज त्या धनाने लाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या खाजगी आयुष्यात मित्र प्रमाणाबाहेर हस्तक्षेप करतील.

**मकर**
इतरांबद्दल वाईट इच्छा बाळगण्यामुळे तुम्हाला मानसिक तणावाला सामोरे जावे लागेल. अशा प्रकारचे विचार टाळणे गरजेचे आहे, तुमच्या आयुष्यासाठी ते घातक आहे आणि कार्यक्षमता कमी करणारे आहे. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**कुंभ**
कामाच्या ताणामुळे थकवा आणि तणाव आज जाणवेल. ज्यांची किंमत वाढतच जाणार आहे अशा वस्तूंच्या खरेदीसाठी आजचा दिवस शुभ आहे. भावनिक आत्मविशास वाढविण्यासाठी प्रयत्न करणा-यांच्या मदतीला ज्येष्ठ धावून येतील.

**मीन**
घरातील ताणतणावामुळे तुम्ही चिडचिड कराल. हे तणाव दडपण्याचा प्रयत्न केलात तर त्यामुळे शारीरिक समस्या वाढतील. म्हणून शारीरिक क्रिया करून त्यावर मात करा. विचित्र छळणारी परिस्थिती सोडून देणेच इष्ट ठरेल. आज तुम्ही घरातून बाहेर खूप सकारात्मकतेने निघाल परंतु, कुठल्या किमती वस्तूची चोरी होण्याने तुमचा मूड खराब होऊ शकतो.

## गणेशोत्सव संपताच मासळी खरेदीसाठी गर्दी



उरण (भावना जैन) : गणेशोत्सवात उपवासाचे दिवस संपताच उरणच्या मासळी बाजारात खरेदीसाठी बुधवारी खवय्यांची गर्दी झाली होती. ७ सप्टेंबरपासून गणपती उत्सव असल्याने व त्यापूर्वी श्रावण महिना सुरू होता. त्यामुळे अनेकांचे उपवासाचे दिवस सुरू होते. मात्र हे उपवास अनंत चतुर्दशीला संपले आहेत. त्यानंतर बुधवार हा पहिलाच दिवस आल्याने खवय्यांची मासळी खरेदीसाठी उरणच्या मासळी बाजारात गर्दी झाली होती.

उरण तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. यामध्ये, सुमारे ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी- विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससून डॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते.

दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे 'फिशिंग- डॉक' करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदी-विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे नव्याने सुरू झालेल्या 'करंजा – द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर' येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत. यामध्ये, सायंकाळच्या सुमारास भरणाऱ्या बाजारामध्ये छोट्या करंदीपासून कोलंबी, पापलेट, सुरमई, रावस, कलेट, हलवा, कुपा, बोंबील अशा सुमारे ३० ते ४० प्रकारचे अनेक मासे विक्रीसाठी दिसून येत आहेत.

# डॉ. अजित रानडे उच्च न्यायालयात, नियुक्ती रद्द करण्याच्या निर्णयाची सोमवारपर्यंत अंमलबजाणी न करण्याचे आदेश



मुंबई (यश सावंत) : गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था अभिमत विद्यापीठाच्या कुलगुरूपदी केलेली नियुक्ती रद्द करण्याच्या निर्णयाला अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय विश्लेषक डॉ. अजित रानडे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. नियमित खंडपीठ उपलब्ध नसल्याने रानडे यांच्या याचिकेवरील सुनावणी २३ सप्टेंबर रोजी होणार असून तोपर्यंत त्यांना हटवण्यात आल्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करू नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती महेश सोनाक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर डॉ. रानडे यांची याचिका सुनावणीसाठी आली. त्यावेळी, याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती डॉ. रानडे यांच्यावतीने न्यायालयाला करण्यात आली. न्यायालयाने त्यास नकार दिला. कुलपतींनी रानडे यांच्या विनंतीवरून त्यांना पदमुक्त होण्यास शनिवार, २१ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र, नियमित खंडपीठ २२ सप्टेंबरपर्यंत उपलब्ध नाही. त्यामुळे, डॉ. रानडे यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी यासाठी त्यांच्या याचिकेवरील सुनावणी होईपर्यंत १४ सप्टेंबरच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाऊ नये, असे न्यायालयाने आपल्या तीन पानी आदेशात स्पष्ट केले. डॉ. रानडे यांच्या याचिकेवरील सुनावणी 23 सप्टेंबर रोजी होणार आहे.

डॉ. रानडे यांची निवड ही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रस्थापित निकषांशी सुसंगत नसल्याचे शोध समितीने त्यांच्या अहवालात नमूद केले होते. त्यानंतर, समितीच्या शिफारशीच्या आधारे कुलपती बिबेक देबरॉय यांनी डॉ. रानडे यांची संस्थेच्या कुलगुरूपदी झालेली नियुक्ती रद्द करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

आपल्याबाबतचा निर्णय दुर्दैवी आणि धक्कादायक आहे. गेली अडीच वर्षे आपण संस्थेत अनेक सकारात्मक बदल करण्यास हातभार लावला आहे. मी परिश्रमपूर्वक आणि आपल्या क्षमतेनुसार काम करत आहे. या सगळ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे, असे डॉ. रानडे यांनी म्हटले आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये आपली गोखले इन्स्टिट्यूटच्या कुलगुरूपदी नियुक्ती झाली आणि सप्टेंबर २०२४ मध्ये, आपल्याला यूजीसीच्या नियमांनुसार दहा वर्षांच्या अध्यापनाचा अनुभव नसल्याच्या कारणावरून काढून टाकण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. हे विचित्र आहे. ही माहिती दोन वर्षांपूर्वी नियुक्ती करणाऱ्या अधिकाऱ्यांना उपलब्ध होती, असेही डॉ. रानडे यांनी त्यांची कुलगुरूपदी झालेली नियुक्ती रद्द करण्याच्या निर्णयाला आव्हान देताना म्हटले आहे.

## 'सीबीएसई पॅटर्न'बाबत संभ्रमाची स्थिती



पुणे (अभिजित येरल्लू) : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार राज्याच्या शिक्षण विभागाचा तिसरी ते बारावीचा अभ्यासक्रम आराखडा अद्याप अंतिम झालेला नसताना सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवणे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. दुसरीकडे सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम करणार म्हणजे नेमके काय होणार, याबाबत शिक्षण विभागातच अजून पुरेशी स्पष्टता आलेली नाही. राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम राबवण्याची, त्यासाठीच्या पुस्तकांची आखणी करण्यास सुरुवात केल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी नुकतीच केली. त्या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रातून विविध मते व्यक्त होत आहेत. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) तिसरी ते बारावीसाठी अभ्यासक्रम आराखडा तयार करून जाहीर केला. या आराखड्यावर शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक अशा विविध घटकांकडून सुमारे ३ हजार ९०० हरकती-सूचना दाखल झाल्या आहेत. त्यानंतर अंतिम केलेला अभ्यासक्रम आराखडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. त्यापूर्वीच शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी राज्यात सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवण्याचे जाहीर केले आहे. त्यासाठी शिक्षक संघटनांशी चर्चा करू, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यात राज्य शैक्षणिक संशोधन परिषद अर्थात एससीईआरटीने अभ्यासक्रम निश्चित करून पाठ्यक्रम तयार केल्यावर बालभारतीकडून पुस्तके तयार केली जातात. मात्र, अद्याप अभ्यासक्रम आराखडाच निश्चित झालेला नाही. त्यामुळे राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवणार म्हणजे काय होणार, याबाबत शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता, त्याबाबत स्पष्टता नसल्याचे त्यांनी सांगितले.

# मुस्लीम समाजाचं वर्चस्व असलेल्या मालेगाव मध्य मतदारसंघाची पार्श्वभूमी काय आहे?



मालेगाव (दिगंबर जाधव) : मालेगाव (मध्य) विधानसभा मतदारसंघ – ११४ हा महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या २८८ मतदारसंघांपैकी एक आहे. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश, २००८ नुसार केलेल्या मतदारसंघांच्या रचनेनुसार, मालेगाव (मध्य) मतदारसंघात नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.८ ते २० आणि २६ ते ६५ यांचा समावेश होतो. मालेगाव (मध्य) हा विधानसभा मतदारसंघ धुळे लोकसभा मतदारसंघात मोडतो. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खलिक हे मालेगाव (मध्य) विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत.

मालेगावची पार्श्वभूमी

मालेगाव हे राज्यातलं संवेदनशील शहर म्हणून ओळखलं जातं. या ठिकाणी मुस्लिमबहुल वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे. करोना काळात मालेगाव पॅटर्नचीही चांगलीच चर्चा रंगली होती. सुरुवातीपासून हा मतदारसंघ संवेदनशील मानला जातो. या ठिकाणी कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर राहतो. मोहम्मद इस्माइल अब्दुल खलिक हे या ठिकाणचे विद्यमान आमदार आहेत. AI-MIM ने त्यांना २०१९ मध्ये तिकिट दिलं होतं. या तिकिटावर ते निवडून आले आहेत. मोहम्मद इस्माइल खलिक हे मुस्लिम असले तरीही मराठी राजकारणी आहेत. ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल म्हणजेच AIMIM या पक्षाचे ते नेते आहेत. असदुद्दीन ओवैसी यांचे ते निकटवर्तीय मानले जातात.

मालेगाव मध्य मतदारसंघात २००९ ला काय स्थिती होती?मुफ्ती मोहम्मद इस्माइल ए. खलीक जनथीपाठी संरक्षण समिती चे उमेदवार होते. त्यांना ७१ हजार १५७ मतं पडली. त्यांनी शेख रशीद हाजी शेख शफी यांचा पराभव केला. त्यांना ५३ हजार २३८ यांचा पराभव केला. शेख आसिफ राशीद हे काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले. त्यांना ७५ हजार ३२६ मतं मिळाली. तर मुफ्ती मोहम्मद इस्माइल कास्मी हे राष्ट्रवादीच्या तिकिटावर लढले मात्र त्यांना ५९ हजार १७५ मतं मिळाली.

# गणरायाला निरोप अन् पावसाचे आगमन

## भारतीय हवामान खात्याचा 'या' जिल्ह्यांना अलर्ट



नागपूर (नितीन देवळेकर: पावसाने गणरायाच्या विसर्जनात कोणताही अडथळा आणला नाही. त्यामुळे भाविकांनी गणरायाला उत्साहात, वाजतगाजत निरोप दिला. मात्र, आता पाऊस पुन्हा परतला आहे. भारतीय हवामान खात्याने राज्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा "अलर्ट" दिला आहे.

राज्यात संपूर्ण गणेशोत्सवात पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या, पण कुठेही मुसळधार पाऊस झाला नाही. दरम्यान, आता झारखंड आणि छत्तीसगड परिसरात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे येत्या दोन दिवसात राज्यातील विविध भागात मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात आणि विशेषकरून विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यात येत्या ४८ तासात पावसाचा जोर वाढणार आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचे अलर्ट देण्यात आले आहे.

शुक्रवार, २० सप्टेंबरला परभणी, हिंगोली, जळगाव, जालना, नांदेड या जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर २१ सप्टेंबरला संपूर्ण विदर्भ, मराठवाड्याला तसेच मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे. २३ सप्टेंबरला संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

# कोल्हापुरात मिरवणुकीत ध्वनी नियमांचे उल्लंघन




कोल्हापूर (नितीन देवळेकर ) : रात्री बाराच्या ठोक्याला आवाजाच्या भिंती बंद केल्यावरून पाठ थोपटून घेण्याचा प्रकार झाला असला तरी त्याआधी कोल्हापुरातील मिरवणूक मार्गावर ध्वनी नियमांचे उल्लंघन झाल्याचे शिवाजी विद्यापीठाने केलेल्या सर्वेक्षणात दिसून आले आहे. यंदा विधानसभा निवडणुका असल्याने गणेशोत्सव वाजत गाजतच साजरा केला गेला. गणेश आगमनाच्या वेळी वाद्यांच्या भिंती उभारल्या होत्या. विसर्जन मिरवणुकीवेळी त्या पुन्हा होत्याच. मात्र त्या मोठ्या आवाजात वाजत असताना त्यावर कोणाचेच नियंत्रण नसल्याचे दिवसभर दिसून आले होते. अनंत चतुर्दशीला शहरातील २२ ठिकाणी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाने ध्वनिमापन केले. त्यामध्ये सर्वच ठिकाणी मोजलेला आवाज हा ध्वनिप्रदूषण नियम २००० च्या मानांकनापेक्षा अधिक होता. औद्योगिक, व्यावसायिक, निवासी व शांत अशा सर्व ठिकाणी आवाजाचे उल्लंघन गतवर्षीपेक्षाही अधिकच असल्याचे दिसून आले. शिवाजी विद्यापीठासारख्या शांत क्षेत्रात गतवर्षी ४५ डेसिबल असणारा आवाज यंदा ७१ डेसिबलपर्यंत वाढला होता. राजारामपुरीसारख्या निवासी भागात ५२ डेसिबल असणारा आवाज यावेळी ९५.३ डेसिबल इतका प्रचंड वाढला होता. गंगावेस या व्यापारी भागात ७७.६ डेसिबल राहिलेला आवाज यावेळी ९४.३ डेसिबल इतका असा दणदणाट सुरू होता. तर उद्यमनगर सारख्या औद्योगिक भागात ५८.४५ डेसिबल असणारा आवाज कालच्या रात्री ७८.४ डेसिबलपर्यंत वाढला होता.

# मोबाइलच्या किपॅडवर 'शून्य' दाबताच लाखोंचा गंडा




मुंबई (विशाल कारंडे) : सायबर चोऱ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. याबाबतची जागृती मुंबई सायबर सेल आणि माध्यमात आलेल्या बातम्यांमधून होत असते. तरीही रोजच्या रोज लोक अशाप्रकारच्या स्कॅमला बळी पडतच आहेत. विशेष म्हणजे सायबर स्कॅमला बळी पडणाऱ्यांमध्ये उच्चशिक्षित आणि उच्चपदस्थ लोकांचे अधिक प्रमाण आहे. मुंबईतील कुलाबा येथे राहणाऱ्या एका रेल्वे अधिकाऱ्याची नुकतीच फसवणूक करण्यात आली. पीडित व्यक्ती छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे मुख्य इलेक्ट्रिक अभियंता म्हणून काम करते. ५९ वर्षीय अधिकाऱ्याला १६ सप्टेंबर रोजी मोबाइलवर एक व्हॉईस मेसेज आला. या मेसेजमध्ये सांगितले गेले की, तुमचा मोबाइल नंबर दोन तासात ब्लॉक होणार आहे. मोबाइलच्या किपॅडवर शून्य दाबल्यास पुढील माहिती मिळेल. पीडित व्यक्तीने शून्य दाबताच एक व्हिडीओ कॉल सुरू झाला आणि पलीकडे असलेल्या व्यक्तीने तो सीबीआय अधिकारी असल्याचे सांगितले. तुमचे नाव मनी लाँडरिंग प्रकरणात गुंतले असल्याचे सीबीआय अधिकाऱ्याने सांगितले. ज्या बँक खात्यातून घोटाळा झाला, त्याच्याशी तुमचा नंबर जोडला असल्याचेही सायबर चोरट्यांनी पीडित अधिकाऱ्याला सांगितले. चोरट्यांनी सांगितलेली बाब रेल्वे अधिकाऱ्याने फेटाळली आणि त्याच्याकडे दुसरा कोणताही मोबाइल नंबर नसल्याचे सांगितले. मात्र तुमच्या नावाचा वापर करून मोबाइल नंबर घेण्यात आला आहे आणि त्या माध्यमातून जेटएअरवेजचे माजी प्रमुख नरेश गोयल यांच्याशी संबंधित २४७ बँक खात्यातून ५८ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे सांगण्यात आले, अशी माहिती पीटीआयने दिली आहे. यानंतर रेल्वे अधिकाऱ्याला दुपारी दोन वाजता पुन्हा एक फोन आला. यावेळी सायबर चोरट्यांनी रेल्वे अधिकाऱ्याकडून त्याची वैयक्तिक माहिती घेतली. कुटुंबाची पार्श्वभूमी आणि आर्थिक तपशीलही जाणून घेतला. यानंतर पीडित रेल्वे अधिकाऱ्याला सांगितले गेले की, त्याला थोड्याच वेळात ऑनलाईन न्यायालयात हजर केले जाणार आहे, तिथे न्यायाधीश त्याच्या प्रकरणाचा निकाल देतील. यानंतर पीडित व्यक्तीला नजरकैदेत ठेवणअयात आले.

# PM likely to inaugurate Metro route till Swargate next week



At a time the Assembly elections are expected to be announced anytime now, Prime Minister Narendra Modi is likely to launch his election campaign for the ruling Mahayuti alliance during his two-day visit next week. PM Modi is set to visit the city on September 26 and 27. He is likely to inaugurate the underground Metro from civil court to Swargate as well as lay foundation stone for its extension from Swargate to Katraj and also the elevated route from Pimpri Chinchwad to Nigdi. "We have been informed about preparing for the inauguration of Metro service route and foundation stone-laying for two extended stretches but there is no confirmation on the event," said a civic officer. According to BJP leader, there will be a public meeting in the city on either day which will be a kind of start of election campaign for Mahayuti as Chief Minister Eknath Shinde of Shiv Sena, Deputy Chief Minister Ajit Pawar of NCP and Deputy Chief Minister Devendra Fadnavis of BJP will be present with their party cadre at the function in a show of strength.

## Team India's Lowest Scores Across Test, ODI, And T20 Formats



The Indian Cricket Team is one of the most followed teams globally. Winners of two ODI World Cups and two T20 World Cups, India is also unique in having reached the World Test Championship final twice and remains a strong contender for the WTC Final 2025 in London. However, like any other team, India has experienced inconsistent performances and challenging periods. Also on ABP Live | Rishabh Pant Engages In Heated Argument With Liton Das During IND vs BAN 1st Test – WATCH Let's take a look at the Indian cricket team's lowest scores across all three formats.

# PM Modi likely to inaugurate Mumbai Metro Line 3 in October



**Mumbai** - The long-awaited Metro 3 corridor is on track for partial commercial operations between BKC and Aarey, with its inaugural run anticipated in early October, according to a senior official from the Mumbai Metro Rail Corporation Ltd (MMRCL). The official noted that Prime Minister Narendra Modi is expected to be in the city for the flag-off ceremony, which coincides with other infrastructure project inaugurations. While some minor works, including automation and system integration, are still pending and should be completed in the next four to five days, the MMRCL has already applied for the Commissioner of Metro Rail Safety (CMRS) for its rolling stock. This application is currently with the Railway Board for final approval. Once that is secured, the MMRCL will proceed with the mainline CMRS application, which is necessary for the commercial operations between BKC and Aarey. Metro 3 represents the city's first underground metro corridor, featuring twin tunnels that span 33.5 km. Of the total stations along the route, ten stations on the 12.5 km stretch are expected to be open to public in early October.

# 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ! सफाई कर्मचारी हा मुंबईचा खरा हिरो - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे







● मुंबई, ( राकेश गायकवाड) :

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 2014 साली 'स्वच्छ भारत अभियान' सुरू करून एक चळवळ उभी केली. त्याचे फलित म्हणजे आज देशभरात हे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. स्वच्छता हा आरोग्याचा मंत्र असून मुंबईमध्ये 'डीप क्लिन ड्राईव्ह'च्या माध्यमातून रस्ते साफ करणे, रस्ते झाडणे, पाण्याने रस्ते धुणे हे काम सुरू आहे. यामुळे मुंबईचे प्रदुषण कमी झाले असून सफाई कर्मचारी हाच खरा मुंबईचा हिरो असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

स्वच्छता ही सेवा-2024 (SHS) या राज्यस्तरीय अभियानाचा मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंग्री मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के. एच.गोविंदराज, मुंबई जिल्हाधिकारी संजय यादव, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, सेना दलाचे अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सफाई कर्मचारी, नागरिक आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी शुभारंभ केलेले हे राज्यस्तरीय अभियान महात्मा गांधी जयंती म्हणजे 2 ऑक्टोबरपर्यंत चालणार असून राज्यातील नागरी व ग्रामीण भागात 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. या स्वच्छता पंधरवडा मोहिमेकरिता सर्वांची भागीदारी असायला हवी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छता ही सेवा अभियानाच्या उपक्रमाद्वारे आर.आर.आर. (रिड्युस, रियुज, रिसायकल) केंद्र उभारून पर्यटन स्थळावर शुन्य कचरा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांअंतर्गत वृक्षारोपण आणि सौंदर्यीकरण करण्याचे काम सुरू आहे. नियमित स्वच्छ न होणारी ठिकाणे शोधण्यात आली असून अशी ठिकाणे कायमस्वरूपी स्वच्छ राहील, याकरिता त्रिसुत्री नियोजन करण्यात आले आहे. यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छ भारत अभियानात महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही. स्वच्छ भारत अभियानात देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. या स्वच्छ भारत अभियानांतर्गत मुंबई महानगरपालिकेने दीड लाख झाडे पावसाळ्यात लावली आहे. या अभियानामध्ये 9,359 कार्यक्रमाची नोंदणी झाली असून सीटीयू (क्लिनलीनेस टार्गेट युनिट) अंतर्गत 4,520 ठिकाणे शोधली असून या ठिकाणचा कचरा उचलला जाणार आहे. याकरिता जनसहभागाचे 4,111 कार्यक्रम राबविले जाणार आहे. मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते या अभियानांचा शुभारंभ झाला. गिरगाव चौपाटी येथे मुख्यमंत्र्यांनी स्वत: स्वच्छतेची सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी ट्रॅक्टर चालवून मशीनद्वारे कचरा संकलन केले. त्याचबरोबर 'करूया वाईट विचार नष्ट, स्वच्छ करूया आपला महाराष्ट्र' हा संदेश देणाऱ्या फलकावर स्वाक्षरी केली.

## आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांचा तडकाफडकी राजीनामा

● नवी दिल्ली, (प्रगती शर्मा) :

बिहार केडरचे मराठमोळे आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांनी पोलीस सेवेचा राजीनामा दिला आहे. यासंदर्भातील माहिती शिवदीप लांडे यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून दिली आहे. शिवदीप लांडे यांनी जवळपास १८ वर्ष पोलीस खात्यात सेवा केली आहे. शिवदीप लांडे यांना बिहारमधील सिंघम म्हणून ओळखलं जातं. दरम्यान, शिवदीप लांडे यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. त्यांनी अचानक राजीनामा का दिला? याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही.

"जय हिंद! माझा प्रिय बिहार, गेली १८ वर्षे शासकीय पदावर सेवा दिल्यानंतर आज मी या पदाचा राजीनामा दिला आहे. एवढ्या वर्षात मी बिहारला माझ्या आणि माझ्या कुटुंबापेक्षा वरचढ मानले आहे. माझ्या सरकारी नोकरीच्या कार्यकाळात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्याबद्दल मी माफी मागतो. आज मी भारतीय पोलीस सेवेचा (आयपीएस) राजीनामा दिला आहे. परंतु, मी बिहारमध्येच राहीन आणि भविष्यातही बिहार माझे कार्यस्थान असेल", असं शिवदीप लांडे यांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटलं आहे.

महाराष्ट्र पोलीस सेवेतही काही वर्ष काम केलं



शिवदीप लांडे हे बिहार केडरचे आयपीएस अधिकारी असले तरी त्यांनी महाराष्ट्र पोलीस सेवेतही काही वर्ष काम केलेलं आहे. मुंबईमध्ये अंमली पदार्थ विरोधी पथकात असताना त्यांनी अनेक धडाकेबाज कारवाया केल्या होत्या. शिवदीप लांडे यांना गुन्हेगारांवर बेधडक कारवाई करण्यासाठी ओळखलं जायचं. अंमली पदार्थ विरोधी पथकात कार्यरत असताना त्यांनी अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर चांगलाच वचक बसवला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक ठिकाणी यशस्वी छापे टाकण्यात आले होते. दरम्यान, शिवदीप लांडे २००६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असून ते मूळ महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील आहेत. दरम्यान, काही आठवड्यांपूर्वी शिवदीप लांडे यांची बिहारमधील पूर्णियामध्ये आयजी पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी या पदाची जबाबदारीही स्वीकारली होती. मात्र, आयजी पदाचा पदभार घेऊन काही दिवस होताच शिवदीप लांडे यांनी आज (१९ सप्टेंबर) आपल्या पोलीस सेवेचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे शिवदीप लांडे यांनी तडकाफडकी राजीनामा देण्याचं कारण काय? याबाबत आता अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## मालेगावात ठाकरे गटाला धक्का, माजी तालुकाप्रमुखाचा पक्षत्याग

● मालेगाव, (दिगंबर जाधव) :



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी तालुकाप्रमुख रामा मिस्तरी यांनी पक्ष सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यामुळे ठाकरे गटाला मालेगावात धक्का बसला आहे. अविभाजित शिवसेनेत मिस्तरी यांनी अनेक वर्षे मालेगाव महानगरप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली होती. शिवसेनेतील फुटीनंतर मालेगावातील बहुसंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. मिस्तरी हे मात्र ठाकरे गटातच राहिले. ठाकरे गटाने त्यांना तालुकाप्रमुख केले. अलीकडेच, ठाकरे गटाने अचानक मिस्तरी यांचेकडील पद काढून जितेंद्र देसले यांना दिले. यामुळे मिस्तरी आणि समर्थकांमधील नाराजी उफाळून आली आहे. या नाराजीतूनच त्यांनी राजीनामा दिला. पत्रकार परिषद घेऊन मिस्तरी यांनी राजीनाम्याची घोषणा केली. यावेळी त्यांनी ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांच्यावर टीकास्त्र सोडले. आपल्याला कोणतीही पूर्वसूचना न देता आपले पद काढून घेण्यात आले असून त्यास हिरे हे जबाबदार असल्याचा आरोप मिस्तरी यांनी केला. काही दिवस पक्षापासून अलिप्त राहिलेले बंडू बच्छाव यांना गेल्या महिन्यात आपण संजय राऊत यांच्याकडे घेऊन गेलो होतो. त्यानंतर बच्छाव सक्रिय झाल्याने मालेगाव बाह्य मतदार संघात उमेदवारीसाठी प्रमुख दावेदार झाले. त्याचा हिरे यांना राग आला असावा आणि त्यातून त्यांनी आपल्याला पदावरुन काढण्यासाठी षडयंत्र रचले, असेही मिस्तरी यांनी म्हटले आहे.

## कृत्रिम तलावाच्या ठिकाणी अपघाताची शक्यता



● नवी मुंबई, (धनश्री सट्टा) :

नवी मुंबईत गणेश विसर्जन साठी शहरात अनेक ठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली. मात्र विसर्जनाच्या दुसऱ्याच दिवशी ईदची सुट्टी असल्याने सदर विसर्जन तलाव बेवारस अवस्थेत आहेत. त्यातील बहुतांश ठिकाणी सुरक्षा रक्षक नसल्याने कुमारवयीन आणि युवक त्या तलावात डुंबण्याचा आनंद घेत आहेत. मात्र त्यामुळे अपघाताची भीती निर्माण झाली आहे.

प्लास्टिक मुक्त अर्थात पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्याचे आवाहन पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार शहरात २२ नैसर्गिक तलावांच्या सोबतच १३७ कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली होती. त्याला प्रतिसाद देत १ हजार ४६५ घरगुती तर ११ सार्वजनिक असे १ हजार ४७६ गणेश मूर्तींचे विसर्जन या तलावात करण्यात आले.

## भाजपाच्या बालेकिल्ल्यात देवेंद्र फडणवीसांना कुणाशी द्यावी लागेल लढत?

● नागपूर, (नितीन देवळेकर) :

नागपूर लोकसभा मतदारसंघात एकूण सहा मतदारसंघ आहेत. त्यापैकीच एक मतदारसंघ म्हणजे नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघ. हा मतदारसंघ राज्यकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा असून याकडे केवळ नागपूरकरांचंच नाही, संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. त्याचं कारण म्हणजे या मतदारसंघाचे विद्यमान आमदार हे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. दरम्यान, या मतदारसंघाचा राजकीय इतिहास नेमका कसा राहिला आहे? गेल्या विधानसभा निवडणुकीची आकडेवारी काय सांगते? आणि




या मतदारसंघाची सद्यस्थिती काय? याविषयी जाणून घेऊया. नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघ हा नेहमीच भाजपाचा बालेकिल्ला राहिला आहे. नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघाची निर्मिती ही २००९ च्या विधानसभा निवडणुकीच्या एक वर्ष आधी म्हणजे २००८ साली झाली. त्यानंतर २००९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने या मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांना रिंगणात उतरवले. तेव्हापासून आजपर्यंत ते या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. ते सलग तीन वेळा या मतदारसंघातून निवडून आले आहेत. तसेच त्यांनी महाराष्ट्राचं मुख्यमंत्रिपदही सांभाळलं आहे. २०१४ आणि २०१९ या दोन्ही विधानसभा निवडणुकीत भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी या मतदारसंघातून विजय मिळवला आहे. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात काँग्रेसने प्रफुल्ल पाटील यांना उमेदवारी दिली होती. याशिवाय बसपाने डॉ. राजेंद्र पडोले, शिवसेनेने पंजू टोटवानी, तर राष्ट्रवादी काँग्रेसने दिलीप पंचकुले यांना रिंगणात उतरवले होते.

## म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या घरांचे अर्ज करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी!

● मुंबई, (यश सावंत) :

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या २०३० घरांच्या सोडतीसाठी अर्ज भरण्याची मुदत गुरूवारी दुपारी १२ वाजता संपुष्टात येणार होती. ही मुदत संपुष्टात येण्यास काही मिनिटांचा कालावधी शिल्लक असताना मुंबई मंडळाने अर्ज भरण्याच्या मुदतीत १२ तासांची वाढ करत इच्छुक अर्जदारांना दिलासा दिला आहे. त्यानुसार त्यांच्याकडे आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध असतील पण काही कारणांमुळे गुरूवारी १२ वाजेपर्यंत अर्ज करु शकले नाहीत, ते आता रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्ज भरु शकणार आहेत. अर्ज भरून अनामत रक्कमेसह गुरूवारी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे. मुंबई मंडळाच्या २०३० घरांसाठी ९ ऑगस्टपासून अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात झाली. ४ सप्टेंबरला अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया संपुष्टात येणार होती. मात्र महागडी घरे आणि इतर अनेक कारणांमुळे अर्जविक्री-स्वीकृतीस मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार आज गुरूवारी दुपारी ११.५९ वाजता अर्ज भरण्याची मुदत संपुष्टात येणार होती.

## मुंबई विद्यापीठ शैक्षणिक विभागांसाठी नोव्हेंबरमध्ये क्रमवारी जाहीर करणार

● मुंबई, (विशाल कारंडे) :

मुंबई विद्यापीठामार्फत पहिल्यांदाच सर्व शैक्षणिक विभागांसाठी क्रमवारी आराखडा जाहीर करण्यात येणार आहे. सर्व शैक्षणिक विभाग, उप परिसर आणि आदर्श महाविद्यालयांचे विविध निकषांवर मूल्यांकन करून येत्या नोव्हेंबर महिन्यात क्रमवारी जाहीर केली जाणार आहे.

विद्यापीठाअंतर्गत शैक्षणिक विभागांची क्रमवारी (युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्क–यूडीआरएफ) जाहीर करण्याचा निर्णय घेणारे मुंबई विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ ठरले आहे. नुकत्याच १२ सप्टेंबरला पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या उपक्रमास मंजुरी देण्यात आली. क्रमवारीच्या विविध निकषांनुसार सर्वोत्कृष्ट विभागास ५ ते २५ लाखांचे संशोधन अनुदान पुरस्कार, प्रशंसा प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येईल.

मुंबई विद्यापीठातील विज्ञान शाखेअंतर्गत १५, वाणिज्य व व्यवस्थापन, कौशल्य / ऑनलाईन शिक्षण आणि आदर्श महाविद्यालये ८, मानव्यविज्ञान आणि सामाजिक शास्त्रे १०, भाषा १५, आंतरविद्याशाखीय १२ आणि विविध २० अध्यासन केंद्र कार्यरत असून या सर्व विभागांसाठी 'राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा – एनआयआरएफ' आणि 'क्युएस / टाइम्स' क्रमवारीच्या धर्तीवर तसेच 'नॅक'च्या गुणांकन पद्धतीनुसार मूल्यांकन केले जाणार आहे. यासाठी विद्यापीठाने परिमाणात्मक मूल्यांकन प्रणाली तयार केली आहे. 'शैक्षणिक विभागांसाठी



क्रमवारी जाहीर करण्याच्या निर्णयामुळे विविध विभागांना त्यांचा शैक्षणिक दर्जा, क्षमता आणि संधी अशा अनुषंगिक बाबींवर विशेष भर देऊन गुणवत्ता वाढीसाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे', असे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

संशोधन आणि व्यावसायिक क्रियाकलाप, विभागस्तरीय प्रशासन आणि व्यवस्थापन, विद्यार्थ्यांची प्रगती आणि यश, अध्ययन, अध्यापन आणि मूल्यांकन प्रक्रिया, फॅकल्टी आऊटपूट, परिषदा, कार्यशाळा आणि साहचर्य या सहा महत्त्वपूर्ण, तसेच विविध सरकारी व औद्योगिक संस्थामार्फत मिळणारे अनुदान व निधी, महत्त्वाचे संशोधन प्रकल्प, शैक्षणिक सामंजस्य करार व औद्योगिक जगताशी असलेले संबंध आदी विविध निकषांवर विभागांचे तज्ज्ञ समितीमार्फत मूल्यांकन केले जाणार आहे.

### क्रमवारी व पुरस्कारांचे स्वरूप कसे?

सर्व विभागांच्या वर्गवारीनुसार क्रमवारी जाहीर केली जाणार असून प्रत्येक वर्गवारीतून प्रथम येणाऱ्या विभागास ५ ते २५ लाख रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. विज्ञान वर्गवारीतून प्रथम येणाऱ्या विभागास पुरस्कार म्हणून १५ लाख, इतर विभागांसाठी १० लाख, तर अध्यासन केंद्रासाठी ५ लाख रुपये देण्यात येणार आहेत. विज्ञान वर्गवारीतून द्वीतीय क्रमांकासाठी ७ लाख, भाषा मानव्यविज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन वर्गवारीतून ५ लाख आणि अध्यासन केंद्रांसाठी २ लाख रुपये देण्यात येतील. सर्वसाधारण सर्वोत्कृष्ट विभागास अतिरिक्त १० लाख आणि द्वीतीय सर्वसाधारण विभागास ५ लाख रुपये देऊन गौरविण्यात येईल. 'डिपार्टमेंट विथ पोटेंशिएल फॉर एक्सलेंस'अंतर्गत विशेष विभागाची निवड करून पुरस्कार दिले जाणार आहेत. तसेच विद्यापीठातील शिक्षकांना 'बेस्ट रिसर्च फंडिंग ॲण्ड इनोव्हेशन अवार्ड', तसेच उत्कृष्ट संशोधन प्रकाशन पुरस्कारही दिला जाणार आहे.